नोव्हेंबर/November
मंगळवार /Wednesday
दि.०४/Dt:04
२०२६/2026
jagmitra2010@gmail.com

महाराष्ट्रातील दैनिक
जगमित्र
सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Page 6
३ किंमत रूपये Price 3 rupees
www.jagmitra.com

बिड/Beed वर्ष १७ वे /Year 17 अंक १६ /Issue 16 आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

बीड नगरपरिषदेच्या सभेत लोकशाहीचा मुडदा!

बीड नगरपरिषदेत गलिच्छ राजकारण; महिला नगरसेविकेच्या वैयक्तिक आयुष्यावर वार!

नगरपरिषद विकासासाठी की वैयक्तिक दुष्मनी काढण्यासाठी? बीडकरांचा संतप्त सवाल!

विकास खड्ड्यात, राजकारण घरात! बीड नगर परिषदेत महिला लोकप्रतिनिधीचा जाहीर अवमान

ज्या ताटात खाल्ले, तिथेच छेद! विकृत राजकारण्यांविरोधात बीडकरांचा संताप

फुटेज तपासा, काळे कारनामे चव्हाट्यावर आणा; जिल्हाधिकाऱ्यांकडे कडक कारवाईची मागणी

बीड । जगमित्र न्यूज

बीड नगरपरिषदेच्या पवित्र सभागृहाला स्वतःच्या नीच राजकारणाचा आखाडा बनवून महिला नगरसेविकेविरोधात असंसदीय आणि मर्यादा सोडून गरळ ओकणाऱ्या त्या नगरसेवकाविरुद्ध बीडकरांच्या संतापाचा उद्रेक झाला आहे. लोकशाहीचा आणि स्त्री शक्तीचा जाहीर अवमान करणाऱ्या अशा बेताल लोकप्रतिनिधीला सर्वसाधारण सभेत पाऊल ठेवण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तात्काळ सर्वसाधारण सभेचे संपूर्ण व्हिडिओ फुटेज तपासून संबंधित नगरसेवकावर कायमस्वरूपी सभागृह बंदीची कुऱ्हाड चालवावी, अशी थेट आणि आक्रमक मागणी आता जनतेतून केली जात आहे.

बीड नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत शहराच्या विकासावर चर्चा करण्याऐवजी थेट एका महिला नगरसेविकेच्या कौटुंबिक आणि वैयक्तिक आयुष्याबद्दल आक्षेपार्ह विधाने करून लोकप्रतिनिधी पदाला काळिमा फासल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. पैशाचा आणि सत्तेचा इतका माज आलाय का? असा संतप्त सवाल विचारत बीडकरांनी या विकृत राजकारणाचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, संबंधित नगरसेवकाने जाहीर माफी मागावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.महाराष्ट्र हा छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा सांगणारा राज्य आहे. महिलांचा सन्मान करणे ही या मातीची संस्कृती आहे. परंतु बीड नगरपरिषदेत मात्र या संस्कृतीची पायमल्ली करत सभागृहात महिला नगरसेविकेच्या घरापर्यंत विषय नेण्याची हिंमत दाखवली गेली. सभागृह हे शहरातील रस्ते, पाणी, स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत समस्यांवर मंथन करण्यासाठी असते, की नगरसेवकांच्या घरात काय सुरू आहे यावर चिखलफेक करण्यासाठी? असा संतप्त सवाल सुज्ञ नागरिक उपस्थित करत आहेत.राजकीय जाणकारांमधून आणि स्थानिक जनतेमधून या प्रवृत्तीचा कडक शब्दांत समाचार घेतला जात आहे. ज्या क्षीरसागरांच्या तालमीत राजकारणाचे धडे गिरवले, आज त्यांच्याच वारसांविरोधात खालच्या पातळीवर जाऊन गरळ ओकण्याचे काम सुरू आहे. ज्यांची एकेकाळी साधी औकातही नव्हती, ते आज सत्तेच्या हवेत इतके मदमस्त झाले आहेत की, ज्या ताटात खाल्ले त्याच ताटात छेद करत आहेत. जुने वाद आणि

पान २ वर

सभागृहाचे पावित्र्य राखण्यासाठी 'त्या' बेताल नगरसेवकाला कायमस्वरूपी 'नो एन्ट्री' करा!



व्हिडिओ फुटेज तपासा, काळे कारनामे चव्हाट्यावर आणा!

सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालते की तिथे गुंडगिरी आणि शिवीगाळ चालते? असा संतप्त सवाल आता सामान्य करदाते विचारत आहेत. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे कर्तव्यदक्ष आणि कडक प्रशासक म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची स्वतः गंभीर दखल घेऊन सभेचे अधिकृत चित्रीकरण आणि सीसीटीव्ही फुटेज तपासावे. कोणत्या नगरसेवकाने महिला लोकप्रतिनिधीच्या घरापर्यंत विषय नेऊन अपशब्द वापरले, याचे पुरावे समोर आणून अशा प्रवृत्तीला कायद्याचा दणका द्यावा, असा सूर जनतेतून उमटत आहे.

सभागृहाचे पावित्र्य राखण्यासाठी 'नो एन्ट्री'चा बडगा उगारण्याची वेळ!

नगरपरिषद ही जनतेच्या घामाच्या पैशातून उभी राहिलेली संस्था आहे, कोणाच्या बापाची जहागिरी नाही. शहराचे रस्ते, पाणी आणि कचऱ्याचे प्रश्न सोडवण्यासाठी निवडून दिलेले प्रतिनिधी जर घरात काय चाललंय यावर तोंडसुख घेत असतील, तर अशा विकृत मानसिकतेच्या लोकांना सभागृहात बसण्याचा अधिकारच काय? अशा नगरसेवकांवर केवळ समज देऊन भागणार नाही, तर जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या विशेषाधिकारांचा वापर करून या नगरसेवकाला सर्वसाधारण सभांमध्ये उपस्थित राहण्यास तात्काळ बंदी घालावी. ही केवळ एका नगरसेविकेची नाही, तर संपूर्ण बीडमधील महिला वर्गाच्या अस्मितेची मागणी आहे.

प्रशासनाने कारवाई न केल्यास जनआक्रोश रस्त्यावर उतरेल!

सत्तेचा आणि पैशाचा माज डोक्यात गेलेल्या या तथाकथित नेत्यांनी बीडची राजकीय संस्कृती धुळीस मिळवली आहे. जर प्रशासनाने आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या प्रकरणावर तातडीने कारवाई करून त्या नगरसेवकाचा बंदोबस्त केला नाही, तर बीडची जनता आणि महिला संघटना नगरपरिषदेच्या दारात ठिय्या मांडतील, असा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे. महिलांचा अवमान करणाऱ्यांची जागा सभागृहात नसून घराच्या कोपऱ्यात आहे, हे प्रशासनाने कृतीतून दाखवून द्यावे, अशी ठाम भूमिका शहरवासीयांनी घेतली आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र शाखा घनसावंगी समोर क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे विविध मागण्यासाठी धरणे आंदोलन

घनसावंगी । प्रतिनिधी

घनसावंगी अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये शेतकऱ्यांना बँकेमध्ये नवीन पीक कर्ज मिळवण्यात व कर्जमाफी यादीतील शेतकऱ्यांना अनुदान मिळवण्यात अनेक अडचणी येत आहेत. रेगुलर कर्जदार शेतकरी कर्ज रकमा भरूनही त्यांना वेळेवर नवीन पीक कर्ज मिळत नाही. तसेच बँकेत मागील तीन वर्षात नवीन पीक कर्ज वाटपात अनियमितता गोंधळ झालेला आहे. या संपूर्ण प्रकरणी शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी क्रांतिकारी शेतकरी



संघटनेतर्फे शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत धरणे आंदोलन सुरू केलेले आहे.

या धरणे आंदोलनात क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विष्णु शिंदे, जिल्हा आंदोलन प्रमुख बळीराम भाऊ पुंगळे, प्रदेश अध्यक्ष सुरेश भाऊ गवळी, जिल्हा संपर्क प्रमुख दत्ताभाऊ कोल्हे, तालुका अध्यक्ष अनिल मोहिते, तालुका कार्याध्यक्ष नामदेव चिपाटे, तालुका उपाध्यक्ष आप्पासाहेब रणमळे, आंदोलन प्रमुख विठ्ठल शिंदे यांच्यासह घनसावंगी, म.चिंचोली, ढाकेफळ, रामगव्हाण, बहिरगड, मोहपुरी, मांदळा, पिरगबवाडी, तनवाडी, राजेगाव, देवनगर, राहेरा, बोलेगाव, भद्रेगाव ई. गावचे शेकडो शेतकऱ्यांनी या आंदोलनात सहभाग घेऊन आपल्या मागण्या तात्काळ मान्य कराव्यात, अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य न केल्यास न्याय न मिळाल्यास झोनल ऑफिस छत्रपती संभाजीनगर येथे तीव्र उग्र आंदोलन करण्याचा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचने दिला आहे.

लोणी बु. फाटा ते गुंज खुर्द रस्त्याचे काम १५ नोव्हेंबरपर्यंत सुरू न झाल्यास १६ पासून उपोषण : रवींद्र धर्मे

पाथरी । प्रतिनिधी

मौजे लोणी बु. फाटा ते गुंज खुर्द या अपूर्ण रस्त्याचे काम गेल्या तीन-चार वर्षांपासून अर्धवट अवस्थेत असून रस्ता अतिशय खराब झाला आहे. याबाबत वारंवार निवेदन देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उडवा-उडवीची उत्तरे दिली जात आहेत. तरी दि.१५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत या रस्त्याचे काम सुरू न झाल्यास आम्ही लोणीकर ग्रामस्थ सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालय, पाथरी समोर दि.१६ नोव्हेंबर २०२६ पासून उपोषणास बसणार आहोत, असा



इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे परभणी जिल्हाप्रमुख रवींद्र रामकिशन धर्मे यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी आज दि.०२.११.२०२६ रोजी मा. उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथरी यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, आपण दिलेल्या पत्र दि. १७.०४.२०२५ व कोहीनूर कन्स्ट्रक्शन यांनी दिलेल्या हमीपत्रामुळे मागील उपोषण तात्पुरते स्थगित केले होते. मात्र अद्यापही काम सुरू झालेले नाही. लोणी गावात या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून लहान मुले, रुग्णांना त्रास होत आहे. गावात मोठ्या प्रमाणात धुळीमुळे अनेकांना श्वसनाचे आजार झाले आहेत. पावसाळ्यात चिखल होऊन अनेक मोटारसायकल स्लिप होऊन अपघात झाले आहेत.

तिर्थक्षेत्र गुंज खुर्द येथे जाणारे भाविक मोठ्या प्रमाणात याच रस्त्याने प्रवास करतात, त्यांना या नादुरुस्त रस्त्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे. तसेच कानसुर, उमरा, गोंडगाव, अंधापुरी व लोणी येथील नारीकांना देखील याच जीवघेण्या रस्त्यावरून प्रवास करावा लागत

पान २ वर

मारहाण, चोरीचा गुन्हा घडताच अवघ्या काही मिनिटांत आरोपी जेरबंद

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना बीड शहर पोलिसांनी पुन्हा एकदा पोलिसी खाक्या दाखवला आहे. अजिजपुरा परिसरातील ३घ कटिंग दुकानात घुसून दुकानदाराला मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी देत दुकानाची तोडफोड करून गल्ल्यातील रोख रक्कम बळजबरीने घेऊन जाण्याची घटना दि. ३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी घडली. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहर पोलिसांनी तातडीने हालचाली करत अवघ्या काही मिनिटांत संशयित आरोपीला ताब्यात घेतले.

अजिजपुरा परिसरातील ३घ कटिंग दुकानात सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास आरोपीने प्रवेश करून फिर्यादीला मारहाण केली. शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. तसेच दुकानातील साहित्याची तोडफोड करून अंदाजे ३० हजार रुपयांचे नुकसान केले. एवढ्यावरच न थांबता दुकानाच्या गल्ल्यातील २ हजार ५०० रुपये रोख बळजबरीने घेऊन आरोपी पसार झाला. या घटनेची माहिती मिळताच बीड शहर पोलिसांनी विलंब न करता तपासाची चक्रे फिरवली. आरोपीचा शोध घेण्यासाठी तातडीने हालचाली करण्यात आल्या. पोलिसांच्या तत्परतेमुळे अवघ्या काही मिनिटांत संशयित आरोपी शेख रफिक शेख लतीफ राहणार अजित पुरा बीड याला पोलिसांनी ताब्यात घेतले. गुन्हा घडताच दाखविलेल्या या तत्परतेमुळे बीड शहर पोलिसांच्या कार्यक्षमतेची चर्चा सुरू झाली आहे. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २४१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(६), ३२४(४), ११५(२), ३५२ आणि ३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्या सुविद्य पत्नी राजश्री मुंडे यांनी घेतले त्रिपुरा सुंदरी देवीचे दर्शन

अगरतळा येथे भव्य स्वागत, किरण गित्ते दांपत्याने दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा!

परळी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार धनंजयजी मुंडे यांच्या सुविद्य पत्नी सौ. राजश्री धनंजयजी मुंडे सध्या त्रिपुरा दौऱ्यावर असून, त्यांनी अगरतळा येथील अतिशय प्रसिद्ध व पवित्र 'माता त्रिपुरा सुंदरी' मंदिरात जाऊन श्री त्रिपुरा सुंदरी देवीचे अत्यंत भक्तिभावाने दर्शन घेतले. अतिशय निसर्गरम्य आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेल्या अगरतळा शहरात आगमन झाल्यानंतर, विवेकानंद युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.



उषाताई किरण गित्ते यांनी त्यांचे अगरतळा विमानतळावर पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत केले. अगरतळा शहराची निसर्गसंपदा आणि प्रसन्न वातावरण सर्वांचेच लक्ष वेधून घेणारे आहे.

दरम्यान, सौ. राजश्री धनंजयजी मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, त्रिपुरा सरकारचे मुख्यमंत्र्यांचे सचिव किरण गित्ते IAS आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. उषाताई किरण गित्ते यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या आपुलकीच्या व मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

ईशान्य भारतातील ५१ शक्तिपीठांपैकी एक अत्यंत जागृत पीठ म्हणून अगरतळाजवळील (उदयपूर, त्रिपुरा) 'माता त्रिपुरा सुंदरी' मंदिराची विशेष ओळख आहे. पौराणिक मान्यतेनुसार, या ठिकाणी सती देवीचा उजवा पाय गळून पडला होता. या पवित्र स्थानाला स्थानिक भाषेत 'माताबाडी' असेही म्हटले जाते. मंदिराची बांधणी पारंपरिक

पान २ वर

गेवराई शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढला; बीएससी पावडर व फॉगिंग करण्याची सय्यद एजाज यांची मागणी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील विविध भागांमध्ये सध्या डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येची तातडीने दखल



घेऊन प्रभाग क्रमांक १० व ११ मधील नाल्यांमध्ये बीएससी पावडर टाकावी, तसेच संपूर्ण परिसरात औषध फवारणी आणि धूर फवारणी (फॉगिंग) करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गेवराई शहरातील कोरबू गल्ली, मेन रोड, मोंढा, गोविंदवाडी रोड आणि तय्यब नगर या परिसरात डासांचा त्रास दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य रहिवाशांना या समस्येचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन संबंधित भागातील नाल्यांमध्ये बीएससी पावडर टाकणे, औषध फवारणी करणे तसेच फॉगिंग मशीनद्वारे धूर फवारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित या समस्येकडे नगरपरिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात आणि नागरिकांना डासांच्या त्रासातून दिलासा द्यावा, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी केली आहे.

गायरान जमिनीवरील अतिक्रमण भोवले! निमगांव (मा) सरपंचांना पदावरून अपात्रतेचा दणका

जेष्ठ विधिज्ञ ॲड.अविनाश गंडले यांचा प्रभावी युक्तिवाद; हरिष धार्मिक अपर जिल्हाधिकारी बीड यांनी दिला महत्त्वपूर्ण निर्णय

अशोक कातखडे भ्रष्टाचार निर्मूलन समिती मराठवाडा अध्यक्ष यांच्या जिद्दीच्या कायदेशीर लढ्याला अखेर यश

बीड । प्रतिनिधी

शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्याचे चौकशी अहवाल आणि उपलब्ध कागदपत्रांतून स्पष्ट झाल्यानंतर निमगाव मायंबा (ता. शिरूर कासार) येथील विद्यमान सरपंच मंगल महादेव घुंगरड यांना सरपंच पद धारण करण्यास अपात्र ठरविण्याचा महत्त्वपूर्ण आदेश अप्पर जिल्हाधिकारी, बीड यांनी दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामपंचायत वर्तुळात खळबळ उडाली आहे.



निमगाव मायंबा येथील अशोक महादेव कातखडे यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १४(१)(ज-३) अन्वये सरपंच मंगल महादेव घुंगरड यांच्याविरोधात तक्रार दाखल केली होती. संबंधित प्रकरणात तहसीलदार, शिरूर कासार यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली.

मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या संयुक्त स्थळ पाहणीमध्ये संबंधित मालमत्ता क्रमांक ३७४ व ३७५ या गटातील क्षेत्र शासकीय गायरान जमिनीवर असल्याचे तसेच अतिक्रमण झाल्याचे चौकशी अहवालात नमूद करण्यात आले. प्रकरणातील कागदपत्रे, स्थळ पाहणी पंचनामा आणि तहसीलदारांचा चौकशी अहवाल यांचा एकत्रित विचार करून अप्पर जिल्हाधिकारी हरिश धर्मिक यांनी तक्रार अर्ज मंजूर केला. तसेच

पान २ वर

रेणापूर येथे जिजाऊ महिला शेतकरी गटाच्या पुढाकारातून वनराई बंधाऱ्याची उभारणी

जलतारा सिंचन विहीर पुनर्भरण कामाचे उद्घाटन; जिजाऊ महिला शेतकरी गटांचा जलसंधारणासाठी स्तुत्य उपक्रम

पाथरी । आवडाजी ढवळे

पाथरी तालुक्यातील रेणापुर परिसरात लोक सहभागातून श्रमदान करुन पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जल संधारणाच्या कामांना लोक सहभागाची जोड मिळाली आसुन जिजाऊ महिला शेतकरी गटाच्या महिलांनी पुढाकार घेत रेणापूर शिवारातील ओढ्यावर नवीन वनराई बंधारा उभारण्याचा संकल्प केला होता त्या वनराई बंधाऱ्याचे उद्घाटन काल मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सविस्तर वृत्त आसे कि, पाथरी तालुक्यातील रेणापुर शिवारात जिजाऊ महिला शेतकरी गटा च्या वतीने श्रमदान करुण ओढ्यावर वनराई बंधारा निर्मान करण्यात आला होता. त्या वनराई बंधाऱ्याचे उद्घाटन गटविकास अधिकारी ऋषिकेश सावंत व जिल्हा परिषद चे माजी सभापती दादासाहेब टेंगसे यांच्या



हस्ते करण्यात आले. या प्रसंगी रेणापूर प्रशासक सरपंच तथा कृषी विस्तार अधिकारी लोंढे, ग्रामपंचायत अधिकारी कांबळे, कृषी विस्तार अधिकारी संदीपान घुंबरे, सुरेशराव गायकवाड आणि जिजाऊ महिला शेतकरी गटांच्या सर्व महिला ग्रामपंचायत कर्मचारी या सहीत गावकऱ्यांनी मोठ्या संख्यने उपस्थीत होते. गावातील बचत गटाच्या महिलांच्या पुढाकारातून जलसंधारणाचा आदर्श केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून न राहता गावातील महिलांनी एकत्र येऊन जलसंधारणासाठी पुढाकार घेणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना दादासाहेब टेंगसे यांनी दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी आम्ही या अगोदरही अनेक ढाळी चे बंधारे व कोल्हापुरी बंधारे विकसित केली आहेत व यापुढेही गावकऱ्यांनी एकत्र येऊन लोकसहभागातून जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत. प्रत्येक गावाने अशा प्रकारचे उपक्रम राबविल्यास पाणीटंचाईवर मात करणे शक्य होईल, असे आवाहन केले. महिलांच्या पुढाकारातून आणि लोकसहभागातून उभारलेला हा वनराई बंधारा जलसंधारणाच्या चळवळीला बळ देणारा ठरणार आहे. जल ही जीवन है हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत रेणापूरकरांनी जलसंधारणाचा आदर्श निर्माण केला आहे.

मराठवाड्याचा पाणीप्रश्न; आकडेवारीच्या पलीकडचे विदारक वास्तव

जून ते सप्टेंबर या पावसाळी कालावधीत मराठवाड्यात सरासरीपेक्षा सुमारे ३४.५ टक्के कमी पाऊस पडला. विभागातील आठ जिल्ह्यांमध्ये सामान्यतः अपेक्षित असलेल्या ६७९.५ मिलिमीटर पावसाच्या तुलनेत प्रत्यक्षात केवळ ४४५ मिलिमीटर पाऊस नोंदवण्यात आला. म्हणजेच, सरासरीच्या केवळ ६५.५ टक्के पाऊस झाला.

मागील वर्षी याच कालावधीत मराठवाड्यात ९४७ मिलिमीटर पाऊस झाला होता, जो सरासरीच्या १३८.९ टक्के होता. एका वर्षातील पावसाच्या या मोठ्या फरकामुळे मराठवाड्यातील शेती किती प्रमाणात पावसाच्या अनिश्चिततेवर अवलंबून आहे, हे स्पष्ट होते. हा प्रश्न केवळ पावसाचा नाही. तो शेतीच्या अर्थकारणाचा, ग्रामीण रोजगाराचा, पिण्याच्या पाण्याचा आणि विकासाच्या नियोजनाचा आहे.

यंदाच्या पावसाळ्यात मराठवाड्यातील अनेक भागांमध्ये ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यांत दीर्घकाळ पावसाचा खंड पडला. परिणामी, खरीप पिकांना जमिनीतील ओलावा मिळेनासा झाला. सोयाबीनची पाने पिवळी पडली, कापसाची वाढ खुंटली आणि मका, तूर यांसारख्या पिकांवरही प्रतिकूल परिणाम झाला. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमधील उभ्या खरीप पिकांपैकी किमान २५ टक्के पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला होता. या आकड्यांचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे.

२५ टक्के पिकांचे नुकसान म्हणजे प्रत्येक शेतकर्‍याचे नेमके २५ टक्के नुकसान झाले, असा अर्थ होत नाही. काही शेतांमध्ये संपूर्ण पीक वाया गेले असण्याची शक्यता आहे, तर काही ठिकाणी उत्पादनात घट झाली असेल. नुकसानाचे प्रमाण जमीन, पिकाचा प्रकार, पेरणीची वेळ, पावसाचा खंड आणि सिंचनाची उपलब्धता यांनुसार बदलते. मात्र, या परिस्थितीचे गांभीर्य केवळ उत्पादनातील घटीपुरते मर्यादित नाही. शेतकर्‍याने पेरणीसाठी केलेला खर्च, खतांचा खर्च, कीटकनाशकांवरील खर्च, मजुरी आणि कर्जाचे व्याज हे खर्च पीक पूर्णपणे आले नाही तरी कायम राहतात.

उत्पन्न घटते, पण उत्पादनखर्च कमी होत नाही. परिणामी, शेतकर्‍याच्या निव्वळ उत्पन्नावर दुहेरी आघात होतो. शेतीचे अर्थशास्त्र समजून घेण्यासाठी हा मुद्दा महत्त्वाचा आहे. पावसाच्या कमतरतेमुळे केवळ उत्पादन घटत नाही, तर शेतकर्‍याच्या गुंतवणुकीवरील परतावाही कमी होतो. याच कारणामुळे दुष्काळाचा परिणाम एका हंगामापुरता मर्यादित न राहता पुढील हंगामातील पेरणी, कर्जफेड व घरखर्चावरही होतो.

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांना यंदाच्या पावसाच्या कमतरतेचा समान फटका बसलेला नाही. जिल्हानिहाय आकडेवारी पाहिली, तर काही भागांतील परिस्थिती अधिक गंभीर असल्याचे दिसते. जून ते सप्टेंबर या कालावधीत लातूर जिल्ह्यात ३६२.७ मिलिमीटर पाऊस झाला. जिल्ह्याची सामान्य पावसाची सरासरी ७०६ मिलिमीटर असल्याने प्रत्यक्ष पाऊस सरासरीच्या केवळ ५१.४ टक्के होता. परभणी जिल्ह्यात ५६.८ टक्के, धाराशिवमध्ये ६२.२ टक्के आणि बीडमध्ये ६३ टक्के पाऊस झाला. हिंगोलीमध्ये ६९ टक्के, नांदेडमध्ये ७३.३ टक्के, छत्रपती संभाजीनगरमध्ये ७४ टक्के आणि जालन्यात ७४.७ टक्के पाऊस नोंदवण्यात आला. लातूरमध्ये सरासरीच्या निम्म्याच्या आसपासच पाऊस पडणे, ही केवळ हवामानाची नोंद नाही; ती त्या जिल्ह्यातील शेतीसमोरील मोठ्या संकटाची पूर्वसूचना आहे.

दुष्काळ जाहीर झाला हे महत्त्वाचे असले, तरी त्यानंतर शेतकर्‍यांना प्रत्यक्षात किती लवकर मदत मिळते आणि किती मदत मिळते हे अधिक महत्त्वाचे प्रश्न आहेत. पीकनुकसान पंचनामे, मदतीची पात्रता निश्चित करणे, कर्जफेडीला मुदतवाढ, महसुली सवलती आणि रोजगाराच्या संधी यांची अंमलबजावणी वेळेत झाली पाहिजे. ऑक्टोबरच्या सुरुवातीला धाराशिवसह मराठवाड्यातील काही भागांमध्ये शेतकर्‍यांनी पीकनुकसान आणि घटत्या पाणीपुरवठ्याबाबत चिंता व्यक्त केली होते. काही शेतकर्‍यांनी यापूर्वीच्या नुकसानीची मदतही अद्याप मिळाली नसल्याची तक्रार केली होती. दुष्काळात मदत जाहीर करणे आणि ती प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचवणे यांमध्ये अंतर राहिले, तर शेतकर्‍यांची आर्थिक असुरक्षितता वाढते. म्हणूनच मदतीच्या घोषणांपेक्षा तिची अंमलबजावणी, पारदर्शकता, वेळेवर वितरणला प्राधान्य दिले पाहिजे.

धरणे आहेत, मग पाणीटंचाई का?

मराठवाड्यातील पाणीप्रश्नावर चर्चा झाली की मोठ्या धरणांचा आणि जलप्रकल्पांचा उल्लेख केला जातो. जायकवाडीसारख्या प्रकल्पांनी या प्रदेशातील पाणीपुरवठा आणि सिंचनासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मात्र, धरणे बांधली म्हणजे पाणीटंचाई कायमची संपते, असे नाही. धरणातील पाणीसाठा हा पावसाचे प्रमाण, नदीखोर्‍यातील पाण्याची आवक, इतर भागांतील पाणीवापर आणि सिंचनासाठी होणारा उपसा यांवर अवलंबून असतो.

धरणात पाणी साठवले गेले तरी ते प्रत्यक्ष शेतापर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यक्षम कालवे, वितरण व्यवस्था आणि योग्य नियोजन आवश्यक असते. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या गोदावरी खोर्‍यावरील अभ्यासात वरच्या गोदावरी उपखोर्‍यात शेती, उद्योग, लोकसंख्या आणि नागरीकरणामुळे पाण्याची मागणी वाढल्याने जायकवाडी धरणात येणार्‍या पाण्याच्या आवकवर परिणाम होत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला आहे. यामुळे मराठवाड्याच्या पाणीप्रश्नाकडे केवळ स्थानिक पातळीवर न पाहता संपूर्ण नदीखोर्‍याच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने पाहण्याची गरज स्पष्ट होते.

यातून एक महत्त्वाचा प्रश्न समोर येतो. पाण्याची उपलब्धता मर्यादित असताना वेगवेगळ्या भागांतील पाणीवापराचे नियोजन कसे केले जाते? पाणीवाटपात न्याय कसा राखला जातो? आणि धरणांतील पाण्याचा वापर करताना पिण्याचे पाणी, शेती, उद्योग आणि पर्यावरण यांच्यात समतोल कसा साधला जातो? या प्रश्नांची उत्तरे शोधल्याशिवाय केवळ नवीन प्रकल्प उभारून मराठवाड्याचा पाणीप्रश्न सुटणार नाही.

शिष्यवृत्तीची रक्कम खर्चली ज्ञानवृद्धीसाठी; कनिष्ठ विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांची अनमोल भेट!

जवाहर विद्यालयात स्तुत्य उपक्रम

अणदूर । सचिन तोग्गी

दिले तर बरेच काही जाते, पण ज्ञानाची आणि मार्गदर्शनाची भेट ही सर्वोत्तम भेट असते, या विचाराचा प्रत्यय तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून घडवून आणला आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करून शिष्यवृत्तीधारक ठरलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मिळालेल्या यशाचा उपयोग इतर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी करण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला आहे. त्यांच्या या सामाजिक जाणीवेतून आणि शाळेप्रती असलेल्या कृतज्ञतेतून परिसरात त्यांचे विशेष कौतुक होत आहे.



मागील वर्षी इयत्ता सातवीमध्ये शिक्षण घेत असताना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची शिष्यवृत्ती परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण होऊन या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीधारक होण्याचा मान मिळविला होता. शासनाकडून त्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाल्यानंतर त्यांनी या रकमेचा उपयोग केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता शाळेतील इतर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार यावर्षी शिष्यवृत्ती परीक्षेला बसणाऱ्या आपल्या कनिष्ठ विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपयुक्त ठरतील, अशा विविध नामांकित प्रकाशनांची अभ्यासपुस्तके त्यांनी शाळेला सप्रेम भेट दिली.

शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, विविध विषयांचा सराव करता यावा, तसेच नामांकित प्रकाशनांच्या पुस्तकांमधील अभ्यासाच्या सोप्या पद्धती, महत्त्वाचे प्रश्न आणि शॉर्टकट ट्रिक्स यांचा उपयोग करून परीक्षेत चांगले यश संपादन करता यावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. या पुस्तकांमुळे आगामी शिष्यवृत्ती परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच मोठी मदत होणार आहे. या प्रेरणादायी उपक्रमात सहभागी झालेल्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांमध्ये वायकर श्रीराम जयराम, लकी सतिश राठोड, पन्हाळकर विनायक संजय, पाटील रुद्र समाधान, नाईक सृष्टी रामेश्वर, करपे ईश्वरी महादेव आणि नरंगले रुद्र ज्ञानेश्वर यांचा समावेश आहे.

या विद्यार्थ्यांनी शाळेकडून मिळालेल्या शिक्षणाची आणि मार्गदर्शनाची जाणीव ठेवत आपल्या कनिष्ठ विद्यार्थ्यांसाठी केलेली ही मदत खऱ्या अर्थाने आदर्शवत आहे. गुणवत्तेच्या जोरावर शिष्यवृत्ती मिळविणे ही अभिमानाची बाब आहेच; मात्र त्या यशातून इतर विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मार्ग सुकर करण्याचा विचार करणे ही त्याहून मोठी गोष्ट आहे. ज्ञानाची देवाणघेवाण आणि एकमेकांना पुढे नेण्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविणारा हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे. या वेळी शाळेच्या वतीने मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांच्या हस्ते सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी-विद्यार्थिनींचा वही व व पेन देवून सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयातील ज्येष्ठ कलाशिक्षक किरण गायकवाड, नारायणकर मॅडम यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी दाखविलेली शाळेप्रती निष्ठा, कृतज्ञता, सामाजिक बांधिलकी आणि कनिष्ठ विद्यार्थ्यांविषयीची आपुलकी पाहून उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले. या पुस्तकांच्या माध्यमातून भविष्यातही अनेक गुणवंत विद्यार्थी घडतील आणि शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेचा नावलौकिक वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. स्वतःच्या यशाचा आनंद इतरांच्या प्रगतीत शोधणाऱ्या या विद्यार्थ्यांनी ज्ञानदानाचा एक सुंदर आदर्श समाजासमोर ठेवला आहे. खऱ्या अर्थाने हीच त्यांच्या यशाची सर्वात मोठी कमाई ठरली आहे!

मोबाईलच्या व्यसनात अडकलेल्या तरुणाईला मैदानी खेळाचा विसर!

सोशल मीडिया आणि ऑनलाइन गेमच्या आहारी गेलेली तरुणाई; शारीरिक व्यायामासह प्रत्यक्ष संवादही कमी

लोहगाव । निजाम शेख

मोबाईल आज गरज आहे की व्यसन? हा प्रश्न सध्याच्या काळात प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाने संपूर्ण जग जवळ आणले, माहितीचे भांडार हातात उपलब्ध करून दिले; मात्र त्याच मोबाईलच्या अतिवापरामुळे तरुणाईच्या जीवनशैलीत मोठे बदल घडताना दिसत आहेत.

पूर्वी मोकळ्या वेळेत मित्रांसोबत गप्पा मारणे, मैदानी खेळ खेळणे, वाचन करणे किंवा कुटुंबासोबत वेळ घालवणे याला महत्त्व दिले जात होते. आज मात्र अनेक तरुणांचा बहुतांश वेळ मोबाईलच्या स्क्रीनसमोर जात आहे. सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स, व्हिडिओ आणि सतत येणाऱ्या नोटिफिकेशनच्या आभासी जगात तरुणाई इतकी रमली आहे की, आजूबाजूच्या वास्तवाकडेही दुर्लक्ष होत आहे. मोबाईलमुळे शिक्षण आणि ज्ञान मिळवणे निश्चितच सोपे झाले आहे. ऑनलाइन अभ्यासक्रम, शैक्षणिक व्हिडिओ, डिजिटल पुस्तके आणि विविध माहिती सहज उपलब्ध होत आहे. त्यामुळे मोबाईल हे स्वतःमध्ये वाईट साधन नाही. मात्र, त्याचा अतिरेक आणि अनियंत्रित वापर ही चिंतेची बाब बनली आहे.

मोबाईलच्या अतिवापरामुळे अभ्यासाकडे दुर्लक्ष, झोपेच्या वेळेत बदल, एकाग्रतेचा अभाव आणि प्रत्यक्ष संवाद कमी होणे यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. सतत स्क्रीनकडे पाहण्याची सवय लागल्याने मैदानी खेळ, व्यायाम आणि आरोग्यदायी जीवनशैलीकडे दुर्लक्ष होत आहे. विशेष म्हणजे, सोशल मीडियावरील आभासी जग आणि प्रत्यक्ष जीवन यातील फरक समजून घेणेही गरजेचे आहे. इतरांचे फोटो, यश आणि आकर्षक जीवनशैली पाहून स्वतःची त्यांच्याशी तुलना करण्याची सवय तरुणांनी टाळली पाहिजे. कारण सोशल मीडियावर दिसणारे प्रत्येक चित्र म्हणजे संपूर्ण वास्तव नसते.

या परिस्थितीत पालक आणि शिक्षकांची जबाबदारीही महत्त्वाची आहे. केवळ मोबाईल हिसकावून घेण्यापेक्षा तरुणांशी संवाद साधणे, त्यांना मैदानी खेळ, वाचन, कला आणि सामाजिक उपक्रमांकडे वळवणे अधिक गरजेचे आहे. घरातही ठराविक वेळ मोबाईलमुक्त ठेवण्याची सवय लावली पाहिजे. आज गावोगावी मैदानांची उपलब्धता, क्रीडा साहित्य आणि खेळांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. स्थानिक पातळीवर कबड्डी, खो-खो, क्रिकेट, फुटबॉल यांसारख्या स्पर्धांचे आयोजन केल्यास तरुणाईला मोबाईलच्या आभासी जगातून बाहेर पडून मैदानी खेळांकडे वळण्याची संधी मिळू शकते. तरुणाई ही देशाची खरी ताकद आहे. तिच्या हातातील मोबाईल ज्ञान, कौशल्य आणि प्रगतीचे साधन बनले पाहिजे; वेळ वाया घालवणारे व्यसन नव्हे.

मोबाईल आपल्या हातात असावा; मात्र आपल्या आयुष्याचा ताबा मोबाईलच्या हातात जाऊ नये. तंत्रज्ञानाचा वापर करा, पण त्याचे गुलाम होऊ नका! मैदानी खेळांना पुन्हा प्राधान्य द्या, कारण निरोगी तरुणाईतूनच सक्षम समाज आणि सशक्त राष्ट्राची निर्मिती होते.संपादकीय सूचना: हा लेख दैनिकाच्या विशेष लेख, रविवार विशेष किंवा जनजागृतीपर सदरासाठी योग्य आहे. शेवटी दिलेला मैदानी खेळांना प्राधान्य देण्याचा मुद्दा ग्रामीण भागातील वाचकांशी अधिक प्रभावीपणे जोडला जाईल.

जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला हजारो मजुरांचा मोर्चा

धाराशिव । प्रतिनिधी

रोजगार हमी योजनेंतर्गत तातडीने काम उपलब्ध करून द्यावे, दुष्काळग्रस्त मजूर कुटुंबांना २५ हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी आणि बेरोजगार भत्ता लागू करावा, यासह विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी मजदूर संघटनेच्या वतीने सोमवारी (दि. २) जिल्हाधिकारी कार्यालयावर काम मागणी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात हजारो महिला, पुरुष मजूर आणि ग्रामीण भागातील कष्टकरी सहभागी झाले होते.

महाराष्ट्राचे प्रमुख समन्वयक जीवन राठोड यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून मोर्चाला सुरुवात झाली. मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. रोजगार हमीची कामे, मजुरीवाढ, बेरोजगार भत्ता, जॉब कार्ड, ई-केवायसी, फेस अटेंडन्समधील तांत्रिक अडचणी आणि बँका व वित्तीय संस्थांकडून होणारी सक्तीची कर्जवसुली बंद करण्याच्या मागण्या यावेळी करण्यात आल्या.

यावेळी जीवन राठोड म्हणाले की, रोजगार हा मजुरांचा घटनात्मक आणि कायदेशीर हक्क आहे. तो शासनाचा उपकार नाही. वारंवार मागणी करूनही मजुरांना काम मिळत नाही. काम न मिळाल्यास देय असलेला बेरोजगार भत्ताही दिला जात नाही. शासनाने या प्रश्नांची तातडीने दखल घ्यावी. मागण्या मान्य न झाल्यास आगामी हिवाळी अधिवेशनावर राज्यस्तरीय मोर्चा काढण्याचा इशाराही त्यांनी दिला.

ज्येष्ठ कामगार नेते सुभाष लोमटे यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. मजुरांच्या हक्कांच्या लढ्यासाठी सर्व कामगार संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले. या वेळी प्रत्येक मजूर कुटुंबाला २५ हजार रुपये मदत, मागणीप्रमाणे तातडीने रोजगार, काम न मिळाल्यास बेरोजगार भत्ता, मोफत जॉब कार्ड व ई-केवायसी, महिला मजुरांसाठी योग्य काम, ग्रामपंचायतींमध्ये सार्वजनिक कामांचा आराखडा आणि प्रतिदिन ५०० रुपये मजुरी देण्याची मागणी करण्यात आली. साप्ताहिक मजुरी जमा करावी, अशीही मागणी आहे. मोर्चाच्या आयोजनासाठी लक्ष्मी ठाकूर, विजय राजपूत, वर्षा वाघमारे आणि आम्रपाली कांबळे यांनी परिश्रम घेतले. रोजगार आणि आर्थिक न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

चारित्र्याच्या संशयातून पत्नीचा खून; फरार पतीला शेतातील गोठ्यातून अटक

कळंब । प्रतिनिधी

चारित्र्यावर संशय घेत चैन आणि दगडाने डोक्यात वार करून पत्नीची हत्या केल्यानंतर फरार झालेल्या गणेश उर्फ विनायक शिवाजी टेकाळे याला कळंब पोलिसांनी अटक केली. पिंपळगाव (डोळा) शिवारातील एका शेतातील गोठ्यात तो लपून बसल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २ ते सायंकाळी ६ या कालावधीत हसेगाव (के) शिवारात मानधने पेट्रोल पंपासमोरील शेतात ही घटना घडली. पत्नी कोमल गणेश उर्फ विनायक शिवाजी टेकाळे हिच्या चारित्र्यावर संशय घेत आरोपी पती गणेश याने तिच्या डोक्यावर चैन आणि दगडाने वार केले. या हल्ल्यात कोमल यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी बंडू विश्वंभर पवार (रा. करंजकल्ला, ता. कळंब) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४३४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) नुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपीचा शोध सुरू होता. मात्र, तो वारंवार वास्तव्याचे ठिकाण बदलत असल्याने पोलिसांना त्याचा ठावठिकाणा लागत नव्हता. अखेर गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी पिंपळगाव (डोळा) शिवारातील शेतातील गोठ्यात छापा टाकून त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा पुढील तपास कळंब पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शकील शेख, सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान बजबळकर तसेच पोलीस अंमलदार अनिल भोसले, किरण माळी, औदुंबर गजबार आणि सुनील तारळकर यांच्या पथकाने केली.

पान १ वरून...

बीड नगरपरिषदेच्या सभेत

वैयक्तिक दुष्मनी काढण्यासाठी शहराच्या विकासाचा बळी दिला जात असून, 'विकास गेला खड्ड्यात, आम्ही फक्त बदला घेऊ' अशा विकृत मानसिकतेत विरोधक वावरत असल्याची टीका होत आहे.एका महिला लोकप्रतिनिधीचा अशा प्रकारे अवमान करून बीडच्या राजकीय संस्कृतीची पातळी घसरवणाऱ्या या तथाकथित नेत्यांनी त्वरित महिला नगरसेविकेची आणि बीडच्या जनतेची जाहीर माफी मागावी. सत्ता येते आणि जाते, पण जनमानसातील प्रतिष्ठा एकदा संपली की पुन्हा मिळत नाही. बीडची स्वाभिमानी जनता महिलांचा हा अपमान कधीही सहन करणार नाही आणि अशा विकृत राजकारण्यांना येत्या काळात योग्य तो धडा शिकवल्याशिवाय गप्प बसणार नाही, असा स्पष्ट इशारा शहरवासीयांनी दिला आहे.

लोणी बु. फाटा ते गुंज खुर्द रस्त्याचे काम

आहे. जर दि.१५ नोव्हेंबर पर्यंत काम सुरू न झाल्यास दि.१६ नोव्हेबर पासून उपोषण करण्यात येईल व उपोषणादरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास त्यास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल, याची नोंद घ्यावी, असे निवेदनात नमूद केले आहे.

या निवेदनावर रवींद्र धर्मे, रंजित गिराम, प्रकाशराव धर्मे, भगवान धर्मे, कारभारी गवारे, दिंगांबर चिद्रावार, विनायक मोरे, प्रल्हाद धर्मे, गजानन धर्मे, जगन्नाथ बादाडे, प्रद्युम्न कदम, नवनाथ गिराम, शिवराम धर्मे, अमोल धर्मे व बाबासाहेब धर्मे यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाची प्रत उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व पोलीस निरीक्षक, पाथरी यांना माहितीस्तव देण्यात आली आहे.

परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्या

कूर्माकार (कासवाच्या आकाराची) शैलीत झालेली असून मंदिराच्या मागे 'कल्याण सागर' हा पवित्र तलाव आहे. अत्यंत शांत, सुंदर आणि अध्यात्मिक ऊर्जेने भरलेला हा परिसर भक्तांना भावूक व नतमस्तक करणारा आहे. या त्रिपुरा दौऱ्यादरम्यान सौ. राजश्री मुंडे यांनी देवी त्रिपुरा सुंदरीच्या चरणी परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिक आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या सुख, समृद्धी, शांतता व उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली.

गायरान जमिनीवरील अतिक्रमण भोवले

सरपंच मंगल महादेव घुंगरड यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदीनुसार सरपंच पद धारण करण्यास अपात्र ठरविण्याचा आदेश दिला आहे.

या निर्णयात संबंधित आदेशाची नोंद ग्रामपंचायतीच्या अभिलेखात घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. आदेशाने समाधान न झाल्यास विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे १५ दिवसांच्या आत अपील दाखल करण्याची तरतूद नमूद करण्यात आली आहे. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाच्या प्रकरणात कायद्याची तरतूद लागू करून सरपंच पदाबाबत अपात्रतेचा निर्णय देण्यात आल्याने या निकालाकडे जिल्ह्यातील ग्रामपंचायत वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या प्रकरणात सहकार्य म्हणून ॲड.इम्रान पटेल, ॲड.सचिन गिरी, ॲड.बप्पा माने, ॲड.किरण मस्के, ॲड.राजेश शिंदे, ॲड.शुभम सरवदे, ॲड.रविंद्र बर्ड, ॲड.झिणे, ॲड.सक्षणा जावळे यांनी काम पाहिले.

पान ६ वरून...

गोकुळच्या सत्तासंघर्षात शेतकऱ्यांच्या

नगरपालिका आणि जिल्हा परिषदांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही घडू शकतात. प्रशासकीय काळात तोटा वाढत असताना आणि दुष्काळासह चाऱ्याच्या प्रश्नांसारखी आव्हाने असताना निर्णय घेणारे लोकनियुक्त मंडळच अस्तित्वात नसणे ही महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी बाब असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

गोकुळच्या विरोधी संचालकांनाही त्यांनी नम्र आवाहन केले असून, शेतकरी उत्पादकांचा कौल स्वीकारून पुढील सभेला उपस्थित राहावे, असे म्हटले आहे. आम्ही कायद्याच्या आणि लोकशाहीच्या मार्गाने लढत राहणार आहोत. महाराष्ट्रातील सहकाराचा वारसा जपण्यासाठी आणि लोकशाही वाचविण्यासाठी गोकुळच्या साडेचार लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांचा आवाज बनून पत्रकारांनी जनतेसमोर वस्तुस्थिती मांडावी, अशी कळकळीची विनंती आमदार सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील यांनी केली आहे.

दिवाळीसाठी पिंपरी आगारातून

विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक फलाटाला क्रमांक देण्यात आला असून, संबंधित फलाटावरून कोणत्या ठिकाणी जाणारी बस सुटणार आहे, याची माहिती नोंदविण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांना आपल्या गंतव्यस्थानाची बस सहज शोधता येणार असून बसस्थानकावरील अनावश्यक धावपळ आणि गोंधळ कमी होण्यास मदत होणार आहे.

गर्दीचे व्यवस्थापन अन् सुरक्षिततेला प्राधान्य

दिवाळीच्या काळात प्रवाशांची गर्दी लक्षात घेता बसस्थानकांवर वाहतूक व्यवस्थापन, फलाटावरील नियोजन आणि प्रवाशांना आवश्यक मार्गदर्शन करण्यावर भर दिला जाणार आहे. अतिरिक्त बसफेऱ्यांमुळे प्रवाशांना प्रवासाचे अधिक पर्याय उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. प्रवाशांनी शक्यतो प्रवासाचे नियोजन आधीच करावे आणि अधिकृत तिकीट आरक्षण सुविधांचा वापर करावा, असे आवाहन आगार व्यवस्थापनाकडून करण्यात आले आहे.

पवन घुगरे यांची शिवसेना शिंदे गटाच्या तुळजापूर तालुका गटप्रमुखपदी निवड!

अणदूर । सचिन तोग्गी

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी संघटनेचे नेते पवन बसवराज घुगरे यांची शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या तुळजापूर तालुका गटप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि शेतकरी चळवळीतील कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. या निवडीमुळे अणदूरसह परिसरातील शिवसैनिक आणि त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या नियुक्तीचे अधिकृत पत्र तुळजापूर विधानसभा संपर्कप्रमुख शिवसेना शिंदे गटाचे गणेश देवानंद रोचकरी यांच्या हस्ते पवन घुगरे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व मित्रपरिवार उपस्थित होते.



पवन बसवराज घुगरे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून सर्वसामान्य जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी त्यांनी गावपातळीवर विशेष प्रयत्न केले आहेत. शासकीय कार्यालयांमध्ये सर्वसामान्य नागरिकांची कामे मार्गी लावणे, गरजू लोकांना मदत करणे तसेच जनतेच्या प्रश्नांसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करणे, अशा विविध माध्यमांतून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

विशेषतः शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ते नेहमीच आक्रमक भूमिका घेत आले आहेत. शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, शेतीमालाचे प्रश्न आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली आहेत. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवित त्यांनी परिसरात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची आणि जनसंपर्काची दखल घेत कार्यकर्ते व मित्रपरिवाराने त्यांना राजकीय क्षेत्रात सक्रिय होण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांच्या आग्रहाखातर त्यांनी मागील पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत अणदूर पंचायत समिती गणातून निवडणूकही लढवली होती. या माध्यमातून त्यांनी स्थानिक पातळीवरील राजकारणातही आपला सहभाग नोंदविला.

त्यांच्या आजवरच्या सामाजिक कार्याचा अनुभव, शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण, सर्वसामान्य नागरिकांशी असलेला थेट संपर्क आणि संघटनात्मक कार्य करण्याची क्षमता लक्षात घेऊन गणेश देवानंद रोचकरी यांनी त्यांची तुळजापूर तालुका गटप्रमुखपदी नियुक्ती केली आहे. या नियुक्तीमुळे तुळजापूर तालुक्यात शिवसेना शिंदे गटाची संघटनात्मक ताकद वाढविण्यास मदत होणार असून ग्रामीण भागातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याची संधी मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी माडजे भाऊजी, ॲड. उदय भोसले, लोमटे सर, सोमनाथ डांगे, लालसाहब शेख, कुंभार मामा यांच्यासह शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पवन बसवराज घुगरे यांच्या निवडीबद्दल शिवसेना शिंदे गटातील पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि अणदूर परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

दुष्काळी स्थितीत शेतकरी, शेतमजुरांना आधार द्या...!

भूम । प्रतिनिधी

शेतकरी, शेतमजूर, महिला आणि वंचित घटकांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)च्या वतीने भूम तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. मराठवाडा उपाध्यक्ष भागवत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या या मोर्चानंतर मुख्यमंत्र्यांच्या नावे तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

निवेदनातून सहा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी व शेतमजुरांना तातडीने आर्थिक मदत द्यावी. भूम शहरातील इंदिरानगर परिसरात जिल्हा परिषद शाळेपासून सुमारे ५०० मीटर अंतरावर सुरू असल्याचा आरोप असलेल्या अवैध दारूविक्रीवर कारवाई करून संबंधित दुकानांचे परवाने रद्द करावेत, अशी मागणी करण्यात आली.

दै. जगमित्र दि. 4/11/2026

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM
OLD NAME- AJIT RAGHUNATHRAO KARAD
TO
NEW NAME- AJIT RAGHUNATHRAO KENDRE
ADDRESS- NEAR BUS STAND ROAD] HOUSE NO.- 490/1 PARLI V, DIST -BEED MAHARASHTRA-431515

जा.क्र. ४३४/२०२६-२७
कार्यालय नगर परिषद परळी वैजनाथ
जिल्हा बीड दिनांक :- ३/११/२६

नगर परिषद परळी वैजनाथ

ई-निविदा क्रमांक (१०) बांधकाम विभाग / २०२६-२७

मुख्याधिकारी नगर परिषद परळी वैजनाथ यांनी ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा सुचना दिनांक ०२.११.२०२६ रोजी वेळ दुपारी ०४.०० वाजता पुढील सांकेतीक स्थळावर प्रसिध्द केली आहे. www.mahatenders.gov.in या वेबसाईडवर प्रसिध्द केल्या आहेत तेंव्हा इच्छुक निविदा धारकांनी दिनांक ११.११.२०२६ रोजी वेळ ०४.०० वाजेपर्यंत निविदा भरावी.

मुख्याधिकारी
नगर परिषद परळी वैजनाथ

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना — बुधवार दि.०४ नोव्हेंबर २०२६ — पाने ४ पान नं.३

परभणीत भाडेकरू तरुणाचा भोसकून खून; गंगाखेड रस्त्यावरील फरीद कॉलनीतील घटना चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

परभणी । प्रतिनिधी

घरात वडिलांना वारंवार शिवीगाळ केल्याच्या कारणावरून चौघांनी मिळून ३१ वर्षीय भाडेकरू तरुणाचा धारदार शस्त्राने भोसकून खून केल्याची घटना परभणी शहरातील गंगाखेड रस्त्यावरील फरीद कॉलनी परिसरात सोमवारी (दि. २) घडली. इरफान खान असे मृत तरुणाचे नाव असून, या प्रकरणी चार घरमालकांविरुद्ध कोतवाली पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शमा खान हबीब खान यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे कुटुंब गंगाखेड रस्त्यावरील बागवान गल्ली येथे भाड्याने राहते. सोमवारी रात्री साडेअकराच्या सुमारास त्यांचा मुलगा इरफान कामावरून घरी आला. घरातील कुलर लावण्यावरून त्याचा वडिलांशी वाद झाला. यावेळी इरफान वडिलांना जोरजोरात शिवीगाळ करू लागला. शिवीगाळ ऐकून घरमालक शेख लतीफ शेख यासीन, शेख एजाज शेख लतीफ, शेख साबेर शेख लतीफ आणि शेख बब्बू शेख लतीफ हे चौघे इरफानच्या घरात आले. घरात आई-बहिणी असल्याने शिवीगाळ करू नको, असे म्हणत त्यांनी इरफानला थापडाबुक्क्यांनी मारहाण केली. इरफानने आपण वडिलांना शिव्या देत असून, आरोपींना काही बोललो नसल्याचे सांगितले. मात्र, आरोपींनी त्याला मानेला धरून घराबाहेर काढत धक्काबुक्की केली. याचवेळी शेख एजाज याने कमरेचे धारदार शस्त्र इरफानच्या गुप्तांगात खुपसल्याने तो जमिनीवर कोसळला. गंभीर जखमी इरफानला त्याचा भाऊ सोहेल याने मित्राच्या मदतीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर त्याला आयसीयूमध्ये हलविण्यात आले. मात्र, मंगळवारी पहाटे साडेचारच्या सुमारास अतिरक्तस्रावामुळे त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी चौघांविरुद्ध संगनमताने मारहाण करून खून केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

शिक्षकासह ५० व्यक्तींना गंडा घालणारा मुख्य सुत्रधार आरोपी मो. एजाज मो. रफिक सलाट गजाआड

जालना । ज्ञानेश्वर साळुंखे

जालना मार्केटिंग मध्ये बाबा ट्रेंडींग नावाने व्यवसाय सुरु करुन आरोपीचे बाबा ट्रेंडींग व ऋ्ञउऋ कंपनी मध्ये गुंतवणुक केल्यास तिन पठ लाभ मिळतो असे लाभाचे आमिष देऊन गुंतवणुकदारांना त्यामध्ये गुंतवणुक करण्यास भाग पाडले आणि मोठया प्रमाणावर गुंतवणुक करुन घेऊन नंतर पसार झालेल्या आरोपीच्या आर्थिक शाखा जालना यांनी मुसक्या आवळल्या. जालना शहरातील शेरसवार नगर येथील तक्रारदार मोहम्मद फेरोज अब्दुल सत्तार व्यवसाय शीक्षक यांचेसह त्यांचे भाऊ व त्यांचे जवळचे ५० गुंतवणुकदारांकडुन ऋ्ञउऋयां कपनीमध्ये गुंतवणुक केल्यास वर्षाला तीनपट रक्कम करुन देण्याचे आमीष देवुन फसवणुक करणाऱ्या टोळीतील तीन आरोपी विरुध्द दिनांक ०३/१०/२०२६ रोजी पोलीस ठाणे कदिम जालना येथे गुन्हा रजि. क्रंमाक ५६४/२०२६ कलम ३१६(४), ३१६(५), ३१८(४), ३५१(२), ३५२, ६१(२), ३(५) इछड सह कलम ३,४,५ चझखऊ कायद्या प्रमाणे यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी वरुन गुन्हा नोंद असुन गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक साहेब जालना यांचे आदेशान्वये आर्थीक गुन्हे शाखा जालना करत आहेत. तक्रारदार यांचेसह इतर व्यक्तींचे १,३२,०५,०००/- रुपये रक्कमेची फसवणुक करुन फरार असलेल्या आरोपींचा शोध पोलीस घेत यापुर्वी १) वसिम अहेमद अब्दुल गफार वय ३७ वर्षे रा. इतवार गल्ली, कचेरी रोड जुना जालना २) मोहम्मद युनुस अहेमद मोहम्मद सलीम वय ३४ वर्षे रा. रा. इतवार गल्ली, कचेरी रोड जुना जालना यांना दिनांक ०७/१०/२०२६ रोजी अटक केलेली आहे. दोन्ही आरोपी सध्या मा.न्यायालयाचे आदेशान्वये जेल मध्ये आहेत.



गुन्हयातील मुख्य सुत्रधार आरोपी मो.एजाज मो.रफिक सलाट हा गुन्हा नोंद झाल्यापासुन फरार असल्याने व तो मोबाईल वापरत नसल्यामुळे आरोपीचा ठाव ठिकाणा मिळण्यास अडसर होत होता अशा वेळी आर्थिक गुन्हे शाखेने अत्यंत गोपणीय रित्या खबऱ्या मार्फत माहीती मिळवुन आरोपी हा बांद्रा मुंबई येथे असल्याची माहीती मिळताच वरीष्ठांचे मार्गदर्शना प्रमाणे स्थानिक पोलीसांची तपासात मदत घेऊन पोलीस ठाणे निर्मल नगर बांद्रा मुंबई येथे पोहचुन आरोपी नामे मोहम्मद एजाज मोहम्मद रफीक सलाट याचा पो स्टे निर्मलनगर बांद्रा येथील सपोनि श्री अण्णासाहेब कदम, गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख पोलीस उप निरीक्षक श्री संतोष कोळगे व गुन्हे प्रगटींकरण पथकातील अंमलदार यांची तपास मदत घेऊन आरोपी एजाज सलाट यास निर्मलनगर पो.स्टे.बांद्रा मुंबई येथुन रात्री ०१:०० वा अटक केली. आरोपीस जालना येथे आणुन आरोपीची अटकेची संपुर्ण कायदेशीर प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर त्यास मा.जिल्हा व सत्र न्यायालय चझखऊन्यायालया समक्ष हजर केले असता आरोपीची तपास कामी ०५ दिवसाची झउठ मा.कोर्टाने मंजुर केली आहे.

गुन्हयातील आरोपीतांनी गुंतवणुकदारांना वर्षाकाठी तीनपट रक्कम करुन देण्याचे आमीष देवुन गुन्हा केलेला असल्याने गुंतवणुकदारांची संख्या वाढण्याची शक्यत असुन ज्यांनी कोणी या कंपनीमध्ये आरोपींच्या आमीषाला बळी पडुन गुंतवणुक केली असेल त्यांनी आर्थीक गुन्हे शाखा येथे येवुन तक्रारी अर्ज सादर करण्याचे अवाहन केले आहे. सदरची कामगीरी ही तेघबिरसिंह संधु पोलीस अधीक्षक जालना, डॉ. विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक जालना, बाळासाहेब पवार, पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा जालना, यांचे मार्गदर्शनाखाली मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक, शैलेश म्हस्के पोलीस उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण, विष्णु कोरडे, ज्ञानेश्वर खुने, श्रेयस वाघमारे, गोंविद दराडे, महीला अंमलदार मंदा नाटकर यांनी पार पाडली.

धनगर पिंपरी येथे ग्राम विकास अधिकाऱ्याला मारहाण व जीवे मारण्याची धमकी; अंबड पोलिसांत गुन्हा दाखल

अंबड । प्रतिनिधी

शासकीय कामात अडथळा आणून ग्राम विकास अधिकाऱ्यास शिवीगाळ करत डोक्यात दगड मारून दुखापत केल्याची आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना धनगर पिंपरी (ता. अंबड) येथे घडली आहे. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धनगर पिंपरी ग्रामपंचायतीचे ग्राम विकास अधिकारी रवींद्र दिलीपराव ढवळे (वय ३८, रा. भाग्योदयनगर, जालना) हे ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.५० वाजेच्या सुमारास धनगर पिंपरी येथील दत्ता संजय कचरे यांच्या घराजवळ उपस्थित होते. आरोपी निवृत्ती जाधव (रा. धनगर



पिंपरी) याच्याकडून ग्रामपंचायत नळ योजनेची पाईपलाईन फुटल्याने ती जोडून देण्याबाबत त्याला कळवण्यात आले. याचा राग धरून, तक्रारदार हे शासकीय कर्मचारी असल्याचे माहिती असतानाही, तू खोटे सांगत आहेस असे म्हणत आरोपीने त्यांना शिवीगाळ केली. तसेच शासकीय कामात अडथळा आणून हातात दगड घेऊन ग्राम विकास अधिकाऱ्याच्या डोक्यात मारून दुखापत केली व जीवे मारण्याची धमकी दिली.

या घटनेनंतर जखमी अधिकाऱ्यावर उपजिल्हा रुग्णालय अंबड येथे उपचार करण्यात आले. पोलीस हवालदार वर्मा (बॅच क्र. १३७४) यांनी रुग्णालयातून एमएलसी जबाब पोलीस ठाण्यात आणून दिल्यानंतर, फिर्यादीच्या जबाबावरून आरोपी निवृत्ती जाधव याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १३२, १२१(१), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा पोलीस हवालदार चापलकर यांनी दाखल केला असून, पोलीस निरीक्षक यांच्या आदेशाने पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नरोडे हे करीत आहेत.

मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या वसुली प्रतिनिधींविरोधात शिवसेना आक्रमक!

महिलांचा मानसिक छळ थांबवा अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार; महिला जिल्हाप्रमुख रूपम घुगे यांचा प्रशासनाला इशारा

बदनापूर । प्रतिनिधी

कर्ज दिले म्हणून महिलांच्या सन्मानाशी खेळण्याचा परवाना मिळाला काय? कर्जाच्या हप्त्यांच्या वसुलीसाठी महिलांना धमकावणे, अपमानास्पद भाषा वापरणे आणि सार्वजनिक ठिकाणी बदनामी करणे, असे प्रकार आता खपवून घेतले जाणार नाहीत, असा आक्रमक इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख रूपम रमेश घुगे यांनी दिला आहे. मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या वसुली प्रतिनिधींकडून महिलांना होत असलेल्या कथित मानसिक त्रासाविरोधात त्यांनी तहसीलदारांना निवेदन सादर केले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव, जिल्हा संघटक भानुदास घुगे यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

बदनापूर तालुक्यातील अनेक महिलांनी विविध मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतले आहे. मात्र, कर्जाचे हप्ते वसूल करण्यासाठी संबंधित कंपन्यांचे प्रतिनिधी महिलांच्या घरी जाऊन दबाव टाकत असल्याच्या, अपमानास्पद भाषा वापरत असल्याच्या तसेच धमकावून मानसिक त्रास देत असल्याच्या तक्रारी समोर येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काही महिलांची सार्वजनिक ठिकाणी बदनामी केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. कर्जवसुलीच्या नावाखाली महिलांचा सन्मान पायदळी तुडवण्याचा अधिकार कोणालाही नाही. कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी असली, तरी वसुलीच्या नावाखाली महिलांना अपमानित करणे, धमकावणे किंवा मानसिक छळ करणे चुकीचे आहे. रिझर्व्ह बँकेच्या वसुलीविषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रतिनिधींवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी घुगे यांनी केली.

निवेदनातून महिलांना धमकावणे व अपमानित करणे तात्काळ थांबविण्याचे आदेश संबंधित कंपन्यांना द्यावेत, बेकायदेशीर व सक्तीच्या वसुली पद्धतींवर कारवाई करावी, तालुकास्तरावर तक्रार निवारण यंत्रणा निर्माण करावी, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रतिनिधी व कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करावी तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासनाला आवश्यक सूचना द्याव्यात, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

महिलांच्या सन्मानासाठी शिवसेना रस्त्यावर उतरणार!

प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन पीडित महिलांना न्याय द्यावा. अन्यथा महिलांच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव, जिल्हा संघटक भानुदासनाना घुगे, महिला जिल्हाप्रमुख रुपम घुगे यांच्यासह राजेंद्र जर्हाड, राहुल जर्हाड, अनिस पठाण, पद्माकर पडूळ, रामेश्वर फड, फैजान मिर्झा, बळीराम कोल्हे, रामराव अंभोरे, रामेश्वर फड, पद्माकर जर्हाड, भाऊसाहेब ढाकणे आदींच्या स्वाक्षर्या आहेत. कर्जाच्या वसुलीपेक्षा महिलांचा सन्मान मोठा आहे, याची जाणीव मायक्रो फायनान्स कंपन्यांनी ठेवावी, अशी ठाम भूमिका महिला आघाडीने मांडली आहे.

गंगाखेड शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या अध्यक्षपदी पिराजी कांबळे

परभणी । प्रतिनिधी

गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या विधानसभा अध्यक्षपदी शिवसेनेचे क्रियाशील कार्यकर्ते पिराजी कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. मुंबई येथील शिवसेनेचे मुख्य कार्यालय बाळासाहेब भवन येथे नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि संसदरत्न खा. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली. शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा आ. राम पंडागळे, शिवसेना मुख्य सचिव व उपनेते संजय मोरे, शिवसेना उपनेते तथा परभणी-हिंगोली लोकसभा संपर्कप्रमुख आनंदराव जाधव आणि गंगाखेड तालुका प्रमुख शाहूराव मुंडे यांच्या हस्ते पिराजी कांबळे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

गंगाखेड विधानसभा क्षेत्रात सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून संघटनात्मक कार्य अधिक प्रभावी करण्याची जबाबदारी कांबळे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. सामाजिक प्रश्न, वंचित घटकांचे हक्क आणि नागरिकांच्या विविध समस्यांसाठी पक्षाच्या माध्यमातून कार्य करण्याची संधी या नियुक्तीमुळे त्यांना मिळणार आहे.

पिराजी नामदेव कांबळे यांच्या निवडीबद्दल शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या कार्याला बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

परभणी मनपाच्या सभेत भाजप गटनेतेपदी विश्वजीत बुधवंत १४ कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव शासनाकडे

परभणी । प्रतिनिधी

परभणी शहर महानगरपालिकेच्या बी. रघुनाथ सभागृहात मंगळवारी सकाळी ११ वाजता विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. महापौर सय्यद इकबाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, प्रभारी नगर सचिव भगवान यादव यांच्यासह नगरसेवक उपस्थित होते. सभेच्या प्रारंभी काँग्रेसचे नगरसेवक सुनील देशमुख यांनी दिवंगत अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला. त्यानंतर संपूर्ण सभागृहाने दोन मिनिटे उभे राहून नाना पाटेकर यांना श्रद्धांजली अर्पण केली.

न्यायालयीन निर्णयानंतर झालेल्या या विशेष सभेत प्रभाग क्रमांक ४ चे नगरसेवक विश्वजीत बुधवंत यांची भाजपच्या गटनेतेपदी निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. महापौर सय्यद इकबाल आणि उपमहापौर गणेश देशमुख यांनी बुधवंत यांचा सन्मान केला. यावेळी भाजपच्या ११ सदस्यांनी त्यांना सभागृहात पाठिंबा दर्शविला. दरम्यान, पूर्वीच्या भाजप गटनेत्यांनी स्वीकृत सदस्याच्या नावाबाबत केलेली शिफारस रद्द करण्याची मागणी केली. त्यानुसार नव्या गटनेत्यांकडून पुढील सभेत स्वीकृत सदस्याच्या नावाची शिफारस केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

सभेदरम्यान गटनेते दिलीप ठाकूर, माजू लाला, अंबिका डहाळे, बबलू घागरमाळे, माजी उपमहापौर भगवानराव वाघमारे, सुनील



देशमुख, राष्ट्रवादीचे अक्षय देशमुख, अर्जुन सामाले, विजय जामकर, भाजपचे रितेश झांबड, गणेश टाक, डॉ. केदार खटिंग, शिवसेनेच्या अंबिका डहाळे, सागर गंगाळे आणि व्यंकट डहाळे यांनी विविध प्रश्नांवरील चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. नगरसेवकांनी सभागृहात मांडलेल्या विविध विषयांवर चर्चा झाली.

दरम्यान, महानगरपालिकेच्या आकृतीबंधातील रिक्त पदांच्या आधारे कंत्राटी कर्मचारी म्हणून कार्य केलेल्या कर्मचाऱ्यांना मनपा सेवेत सामावून घेण्याचा विषय सभागृहासमोर मांडण्यात आला. यामध्ये १४ कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती महापौर सय्यद इकबाल यांनी सभागृहाला दिली. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना मनपा सेवेत सामावून घेण्याबाबत आता शासनाच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

कर्जमाफी झाली, पण शेतकरी अजूनही प्रतीक्षेत!

केवायसी करूनही पंधरा दिवस ते महिनाभर वाट; शाहापूरच्या मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

अंबड । ज्ञानेश्वर साळुंखे

राज्यात दुष्काळाच्या झळांनी शेतकरी बळीराजाचे कंबरडे मोडले असताना शासनाने जाहीर केलेली अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना प्रत्यक्षात शेतकऱ्यांसाठी 'प्रतीक्षा योजना' ठरत असल्याचे चित्र आहे. कर्जमाफीच्या यादीत नाव आले, केवायसीही पूर्ण झाली; मात्र पंधरा दिवसांपासून महिनाभर प्रतीक्षा करूनही लाभ मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आहे.

अंबड तालुक्यातील शाहापूर येथील मध्यवर्ती सहकारी बँकेअंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांची ही अवस्था आहे. यादीत नाव, केवायसी पूर्ण; मग कर्जमाफी अडली कुठे? असा थेट सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. दुष्काळामुळे खरीप हंगाम उद्ध्वस्त झाला असून रब्बी हंगामाचीही चिंता सतावत आहे. अशा परिस्थितीत सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी तातडीने मिळण्याऐवजी शेतकऱ्यांना बँकेच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत.

'शेतकऱ्यांची बँक' म्हणून ओळख असलेल्या मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कारभारावरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कर्जमाफीची घोषणा सरकारची, केवायसी शेतकऱ्यांची; मग लाभ देण्यास विलंब कोणाचा? असा संतप्त सवाल शाहापूरसह सुखापुरी परिसरातील शेतकरी करत आहेत. दिवाळीचा सण तोंडावर आला असतानाही पात्र शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित असल्याने घोषणा झाली, यादी आली, केवायसी झाली; मग कर्जमाफीच्या पैशांसाठी आणखी किती दिवस वाट पाहायची? असा सवाल उपस्थित होत आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पात्र शेतकऱ्यांचा प्रलंबित कर्जमाफीचा लाभ त्यांच्या खात्यावर जमा करावा, अशी मागणी होत आहे.

अडीच हजार रुपयांत दिवाळी कशी साजरी करणार?

सरकारला शेख अनिस यांचा सवाल; दिव्यांगांची दिवाळी काळी होण्याची वेळ!

जालना । प्रतिनिधी

दिवाळीच्या सणानिमित्त राज्यातील दिव्यांगांना विशेष बोनस देण्याऐवजी शासनाने दर महिन्याप्रमाणे केवळ अडीच हजार रुपये मानधन जमा केल्याने दिव्यांग बांधवांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महागाईच्या काळात अडीच हजार रुपयांत दिवाळी कशी साजरी करायची, असा संतप्त सवाल अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शेख अनिस यांनी राज्य सरकारला केला आहे.



दि.२६ ऑक्टोबर रोजी अपंग जनता दल सामाजिक संघटनेच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले होते. यामध्ये दिवाळीनिमित्त दिव्यांगांना अडीच हजार रुपये बोनस देण्यात यावा, दिव्यांगांचे मासिक मानधन सहा हजार रुपये करण्यात यावे, तसेच दिव्यांगांना बस आणि रेल्वे प्रवास मोफत करण्यात यावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या होत्या.

या आंदोलनादरम्यान दिव्यांग विभागाचे उपसचिव घोळगे यांच्याकडे मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले होते. मागण्यांवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले होते. मात्र, ३ नोव्हेंबर रोजी दिव्यांगांच्या खात्यावर दर महिन्याप्रमाणे केवळ अडीच हजार रुपये मानधन जमा झाल्याने दिव्यांगांमध्ये नाराजी पसरली आहे. दिवाळी बोनसची मागणी करूनही शासनाने कोणताही अतिरिक्त निधी दिलेला नसल्याचा आरोप शेख अनिस यांनी केला आहे.

मंत्र्यांनी अडीच हजारांत दिवाळी साजरी करून दाखववावी!

राज्यातील एखाद्या मंत्र्याने किंवा आमदाराने केवळ अडीच हजार रुपयांत संपूर्ण दिवाळी साजरी करून दाखववावी, असे खुले आव्हानही शेख अनिस यांनी दिले आहे. सामान्य नागरिकांनाही महागाईचा सामना करावा लागत असताना आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या दिव्यांगांनी अडीच हजार रुपयांत सण कसा साजरा करायचा? घरखर्च, औषधोपचार आणि इतर गरजा कशा भागवायच्या? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. दिव्यांगांना सन्मानाने जगता यावे, त्यांना आर्थिक आधार मिळावा आणि सणासुदीच्या काळात त्यांच्या चेहऱ्यावरही आनंद फुलावा, यासाठी शासनाने सहा हजार रुपये मासिक मानधन आणि दिवाळी बोनस देण्याच्या मागणीवर तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा दिव्यांगांच्या प्रश्नांसाठी पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शेख अनिस यांनी दिला आहे.

२७ डिसेंबरला माळी समाजाच्या उपवर-वधू परिचय मेळावा व सामूहिक विवाह सोहळा

जालना । प्रतिनिधी

माळी समाजाच्या वतीने आगामी २७ डिसेंबर २०२६ रोजी चिखली शहरात कृष्णप्रिय मंगल कार्यल्य व लॉन येथे आयोजित करण्यात येणाऱ्या उपवर-वधू पालक परिचय मेळावा व सामूहिक विवाह सोहळ्याच्या नियोजनासाठी जालना शहरात शासकीय विश्रामगृह जालना येथे दि. १ नोव्हेंबर रोजी बैठक घेण्यात येऊन, विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. हा मेळावा व विवाह सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी व समाजबांधवांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष शंकरराव लिंगे, कार्याध्यक्ष रमेशभाऊ हिरळकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

बैठकीची सुरुवात महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी आगामी मेळावा व सामूहिक विवाह सोहळ्याच्या आयोजनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात येणाऱ्या जबाबदाऱ्या, नियोजन आणि कामकाज याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी माळी समाजाची सामाजिक, आर्थिक व औद्योगिक क्षेत्रातील प्रगती, तसेच दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर समाजासमोरील विविध प्रश्नांवर उपस्थित विचारवंतांनी आपले विचार मांडले.

यावेळी आयोजन समिती अध्यक्ष श्रीराम झारे, मधुकरराव जाधव, अभय तायडे, केशवराव दळवी, प्रा. दिपक नन्हई, कोषाध्यक्ष श्रीधरराव पुंड, जालना जिल्हाध्यक्ष गणेशराव हरकळ, मॉ सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब शिवाजीराव वानखेडे, बबनराव घायाळ, कर्मचारी आघाडी अध्यक्ष रमाकांत वाघमारे, सचिव इंजि. सुरेश खांडेभराड, महिला आघाडीच्या अध्यक्षा मंगलताई खांडेभराड, उपाध्यक्षा संगिता फुलझाडे, शिक्षक आघाडीचे सचिव राजाभाऊ घोडके, सरचिटणीस महेश खरात, शहराध्यक्ष गजानन खांडेभराड, कोषाध्यक्ष कैलास रसाळ, सहसचिव बाबासाहेब गाडेकर, तालुका संघटक रामेश्वर अनारसे, शहर उपाध्यक्ष रुपेश बारवकर, जालना तालुकाध्यक्ष छगन किटाळे, विजय खैरे, रूपेश बारवकर, मंठा तालुकाध्यक्ष महादेव हजारे, मालतीताई जमधडे, रेखा जमधडेयांच्यासह महिला व पुरुष समाजबांधव उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन माळी महासंघ कर्मचारी आघाडीचे अध्यक्ष बाळासाहेब ठाकरे यांनी केले, तर सावता तिडके यांनी आभार प्रदर्शन केले.

प्रलंबित कामे तातडीने मार्गी लावा : जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांचे विभागप्रमुखांना निर्देश

परभणी । प्रतिनिधी

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना, विशेषतः शेतकरी आणि ग्रामीण भागातील जनतेला दिलासा देण्यासाठी दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे. शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र लाभार्थ्यांपर्यंत त्यांचे लाभ पोहोचवावेत. तसेच विविध विभागांकडील प्रलंबित कामे विनाविलंब पूर्ण करून विकासकामांना गती द्यावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी विभागप्रमुखांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सोमवारी (दि.२) जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुखांची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी विभागनिहाय कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. जिल्ह्यातील महत्त्वाचे प्रश्न, विभागांसमोरील अडचणी, प्रलंबित कामांची सद्यस्थिती आणि शासनाने निर्धारित केलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत त्यांनी माहिती जाणून घेतली.

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक उपाययोजनांचे प्रभावी नियोजन करून त्यांची काटेकोर अंमलबजावणी करावी. शेतकरी आणि ग्रामीण जनतेच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. प्रशासनातील सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विविध विभागांकडील प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा. शासनाने दिलेली उद्दिष्टे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक विभागाने स्वतंत्र नियोजन करावे. केवळ कागदोपत्री उद्दिष्टपूर्ती न करता योजनांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत पोहोचतो की नाही, याची खात्री करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

राज्यस्तरीय योगशिक्षक संमेलन; 'महायोगोत्सव २०२६'चे आयोजन

धुळे येथील योग प्रशिक्षण शिबिराला मोठ्या संख्येने उपस्थित रहा : दिनेश भुतेकर

जालना । प्रतिनिधी

संपूर्ण भारतामध्ये मोठ्या प्रमाणात योग प्रशिक्षण निर्मिती करण्याचे काम रामदेव बाबा यांनी पतंजली या संस्थेच्या माध्यमातून केले आहे. हरिद्वार दिल्ली येथे पतंजली संस्थेमध्ये योग गुरु रामदेव बाबा यांच्या नेतृत्वाखाली दिनेश भुतेकर यांनी योग प्रशिक्षण घेतले आहे. दिनेश भुतेकर यांनी धुळे येथे होणाऱ्या प्रशिक्षित शिबिरासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान केले आहे. योगा फाउंडेशन, महाराष्ट्र संचालित महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे सहावे राज्यस्तरीय योगशिक्षक संमेलन 'महायोगोत्सव २०२६' हे दि. १४ व १५ नोव्हेंबर २०२६ रोजी धुळे येथील श्री स्वामीनारायण मंदिरात आयोजित करण्यात आले आहे.

या दोन दिवसीय राज्यस्तरीय संमेलनात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील योगशिक्षक, योगसाधक आणि योगप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. संमेलनादरम्यान विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. तसेच योगासन स्पर्धा, निबंध स्पर्धा, शोधनिबंध सादरीकरण, लेखांचे प्रकाशन आणि सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांची रेलचेल असणार आहे.

या संमेलनाचे विशेष आकर्षण म्हणजे 'योगानुभूती - ६' या स्मरणिकेचे प्रकाशन होय. या स्मरणिकेमध्ये योगक्षेत्रातील विविध शोध निबंध, लेख, अनुभव आणि विचारांना स्थान देण्यात आले असून ती संमेलनात सहभागी होणाऱ्या योगसाधकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील योगशिक्षकांना एकत्र आणणे, त्यांच्यात संघटनात्मक एकजूट निर्माण करणे, योगशिक्षकांच्या समस्या व प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच योगविद्येचा राज्यभर प्रसार व प्रचार करणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे.

या राज्यस्तरीय संमेलनात महाराष्ट्रातील सर्व योगशिक्षक, योगसाधक व योगप्रेमींनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, राज्य कार्यकारी अध्यक्ष डॉ. कृणाल महाजन, महायोगोत्सव २०२६ नियोजन समितीचे अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, योगा फाउंडेशनचे सचिव अर्जुन शिंदे, राज्य सचिव सुपर्णा पाल, धुळे जिल्हाध्यक्ष मनीषा चौधरी, कोषाध्यक्ष संतोष खरटमोल, योग क्रीडा समिती प्रमुख राहुल येवला, तसेच उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख सुनील गुरव, विश्वनाथ सोमवंशी, संदीप कुलकर्णी विजयपाटील नरेंद्र गांगुर्डे व इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

शेख मौला शेख उस्मान (नांदेड जिल्हा प्रतिनिधी)
मो.9766664949 PRGI.No.- MHMAR/26/A0270

नांदेड जिल्हा आवृत्ती — बुधवार दि.०४ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४

अभिजीत कोलते यांची राज्यस्तरीय विकसित भारत युवा संसदेसाठी निवड

मुदखेड । प्रतिनिधी



सह्याद्रीच्या कुशीत निसर्गाने मुक्तहस्ते उधळलेल्या सौंदर्याप्रमाणेच ग्रामीण मातीतही प्रतिभेची असंख्य बीजे रुजलेली असतात. याच प्रतिभेचा प्रत्यय देत तालुक्यातील मौ.चिलपिंपरी येथील मूळ रहिवाशी असलेले होतकरू विद्यार्थी अभिजीत सुनीता संजय कोलते यांनी यशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'विकसित भारत युवा संसद' उपक्रमांतर्गत अभिजीत कोलते यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून युवकांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव, संसदीय कार्यपद्धतीचे ज्ञान आणि नेतृत्वगुण विकसित व्हावेत, या उद्देशाने 'माय भारत' तर्फे युवा संसदेचे आयोजन करण्यात येते. अभिजीत कोलते यांनी ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी नांदेड येथे आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेत 'एक राष्ट्र, एक निवडणूक' या विषयावर प्रभावी, अभ्यासपूर्ण व सखोल संशोधन केलेले इंग्रजी भाषण देऊन हा सन्मान मिळवला. सदर कार्यक्रम जिल्हा युवा अधिकारी अशनी कानकटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

विशेष म्हणजे, यापूर्वीही भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागामार्फत आयोजित विज्ञान काँग्रेसमध्ये त्यांची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली होती. भारत स्काऊट्स अँड गाईड्सचा प्रतिष्ठेचा राज्य पुरस्कारही त्यांना प्राप्त झाला आहे. नवी दिल्लीच्या केंद्रीय संस्कृत विद्यापीठाकडून शिष्यवृत्ती मिळविण्याचा बहुमानही त्यांनी संपादन केला असून, नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई यांच्या वतीनेही त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे. बालवयापासूनच विविध ऑलिम्पियाड व अनेक स्पर्धांमध्ये पदके व सन्मान प्राप्त करणाऱ्या या विद्यार्थ्याने अभ्यास, विज्ञान, भाषा, वक्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व विकास अशा विविध क्षेत्रांत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. अभिजीत कोलते यांच्या सादरीकरणातून त्यांची भाषेवरील प्रभुत्व, वक्तृत्वकला, बौद्धिक खोली आणि विषयावरील मजबूत पकड दिसून आली. या उल्लेखनीय सादरीकरणाची दखल घेत त्यांची राज्य विधानसभा ठिकाणी आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या राज्यस्तरीय निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मुदखेडमध्ये रस्ते, पाणीटंचाई अन् स्मशानभूमीतील अंधाराचा प्रश्न ऐरणीवर!

नव्याने तयार केलेला रस्ता फोडल्याचा काँग्रेसकडून निषेध; हिंदू-बौद्ध स्मशानभूमीत कायमस्वरूपी प्रकाशव्यवस्था करण्याची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

मुदखेड । प्रतिनिधी

मुदखेड शहरातील रस्ते, पाणीपुरवठा आणि स्मशानभूमीतील मूलभूत सुविधांचे प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले आहेत. प्रभाग क्रमांक १ मध्ये नुकताच तयार करण्यात आलेला चांगल्या दर्जाचा रस्ता पाइपलाइनच्या कामासाठी फोडण्यात आल्याच्या प्रकाराचा शहर काँग्रेसच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला. तसेच संभाव्य पाणीटंचाई आणि हिंदू व बौद्ध स्मशानभूमीतील प्रकाशव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित करीत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी शुभम वाठोरे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

नियोजनाअभावी सार्वजनिक निधीचा अपव्यय

प्रभाग क्रमांक १ मध्ये नालीच्या पाइपलाइनसाठी नव्याने तयार केलेला रस्ता फोडण्यात आल्याबद्दल पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. रस्ता तयार करण्यापूर्वीच पाइपलाइनसह आवश्यक कामे पूर्ण करणे अपेक्षित असताना नियोजनाअभावी सार्वजनिक निधीतून तयार केलेल्या रस्त्याचे पुन्हा खोदकाम करण्यात आले. या प्रकाराची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी आणि रस्त्याचे झालेले नुकसान भरून काढावे, अशी मागणी करण्यात आली.

संभाव्य पाणीटंचाईबाबत चर्चा

आगामी काळात शहरात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता नगर परिषद प्रशासनाने आतापासूनच पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करावे. नागरिकांना नियमित व सुरळीत पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

दोन्ही स्मशानभूमींमध्ये अंधार; कायमस्वरूपी दिव्यांची मागणी

दरम्यान, हिंदू व बौद्ध स्मशानभूमीतील प्रकाशव्यवस्थेचा गंभीर प्रश्न मुख्याधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आला. परवा हिंदू स्मशानभूमीत, तर काल बौद्ध स्मशानभूमीत अंत्यविधीच्या वेळी विद्युत दिव्यांची व्यवस्था नसल्याने नागरिकांना अंधारात अंत्यविधी करावा लागल्याची बाब मांडण्यात आली. अंत्यविधीसारख्या संवेदनशील प्रसंगी प्रकाशव्यवस्थेचा अभाव असणे ही गंभीर बाब असून, दोन्ही स्मशानभूमींमध्ये तातडीने कायमस्वरूपी विद्युत दिव्यांची व्यवस्था करावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली. शहरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे नगर परिषद प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन रस्ते, पाणीपुरवठा आणि स्मशानभूमीतील सुविधांबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी शहर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

यावेळी जिल्हा सरचिटणीस गिरीश कोत्तावार, मुजीब पठाण, गटनेते प्रतिनिधी गंगाधर डांगे, सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर मगरे पाटील, अतीख अहमद, शिवानंद देवके, खदीर कुरेशी, मारोती तुकाराम चव्हाण, विठ्ठल आचार्य, गौस भाई फुलवाले, वेदांत शेवटे, शेख अनिस नायगावकर, शेख मोईन, सुभाष चौदंते, कुलदीप मल्लेवार यांच्यासह आदी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



जीर्ण विद्युत पोल बदला : नगरसेविका सुनंदा कांबळे

कुंडलवाडी । प्रतिनिधी



शहरातील प्रभाग क्रमांक २ मधील वंजार गल्ली परिसरात मठाजवळ असलेला लोखंडी विद्युत पोल अनेक दिवसांपासून जीर्ण होऊन तुटलेल्या अवस्थेत आहे. या धोकादायक विद्युत पोलमुळे परिसरातील नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून, संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी सदर पोल तातडीने काढून नवीन लोखंडी विद्युत पोल बसविण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका सुनंदा कांबळे व नगरसेविका प्रतिनिधी तथा पत्रकार अमरनाथ कांबळे यांनी महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, प्रभाग क्रमांक २ मधील वंजार गल्ली येथील मठाजवळील लोखंडी विद्युत पोल गेल्या अनेक दिवसांपासून जीर्ण होऊन तुटलेल्या अवस्थेत आहे. याबाबत प्रशासनाला तोंडी सूचना देऊनही अद्याप नवीन विद्युत पोल बसविण्यात आलेला नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सध्या संबंधित विद्युत पोलच्या भोवती सिमेंट काँक्रीटचा कच्चा माल टाकून तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र, ही व्यवस्था कायमस्वरूपी नसून भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष द्यावे, जीर्ण झालेला लोखंडी विद्युत पोल काढून त्या ठिकाणी नवीन पोल बसवावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

सावरगावच्या पिण्याच्या पाण्यावर संकट!

निजामकालीन तलावातून अवैध पाणी उपसा सुरूच; प्रशासनाने कारवाई न केल्यास गावकऱ्यांचे आमरण उपोषण

अर्धापूर । संजय पंडित

हदगाव तालुक्यातील मौजे सावरगाव येथील गट क्रमांक ३९२ मधील निजामकालीन तलावातून काही शेतकऱ्यांकडून मोटारी लावून शेतीसाठी बेकायदेशीरपणे पाणी उपसा केला जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. यामुळे संपूर्ण गावाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासनाने तातडीने हा अवैध पाणी उपसा बंद करावा, अशी मागणी समस्त सावरगाव ग्रामस्थांनी केली आहे.

सावरगाव गावाची लोकसंख्या जवळपास ६ हजार असून, गावाच्या नळ पाणीपुरवठा योजनेची विहीर याच निजामकालीन तलावात आहे. गावातील नागरिकांसह जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न या तलावातील पाणीसाठ्यावर अवलंबून आहे. मात्र, यावर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्याने तलावातील पाणीसाठा मोठ्या प्रमाणात घटला आहे. अशा परिस्थितीत तलावालगतच्या सुमारे १६ शेतकऱ्यांकडून मोटारी बसवून शेतीसाठी पाण्याचा उपसा केला जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सततच्या पाणी उपशामुळे तलावातील पाणी झपाट्याने कमी होत असून, आगामी काळात गावाला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

१६ शेतकऱ्यांचा पाणी उपसा बंद करण्याची मागणी

गावकऱ्यांनी प्रशासनाकडे केलेल्या निवेदनात तलावातून शेतीसाठी होणारा पाणी उपसा तात्काळ बंद करावा, संबंधित शेतकऱ्यांकडे पाणी उपशाचे परवाने असल्यास त्यांची तपासणी करून नियमानुसार कारवाई करावी, तसेच आवश्यक असल्यास परवाने रद्द करावेत, अशी मागणी केली आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी समस्त सावरगाव ग्रामस्थांच्या वतीने दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी, हदगाव यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.

प्रशासनाला आमरण उपोषणाचा इशारा!

गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्यापेक्षा शेतीसाठीच्या पाण्याला प्राधान्य दिले जात असेल, तर हे गावकऱ्यांवर अन्यायकारक आहे. प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून अवैध पाणी उपसा बंद करावा व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी. अन्यथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, हदगाव येथे समस्त सावरगाव ग्रामस्थांच्या वतीने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल, असा ठाम इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. आता प्रशासन या गंभीर पाणीप्रश्नावर काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण सावरगाव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

बिलोली येथे दिवाळी पहाट; गीत गायन स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन

कुंडलवाडी । प्रतिनिधी

आजूबाजूच्या परिसरातील सर्व रसिकांना कळविण्यात येते की सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्री शिव हनुमान मंदिर संस्थान देशमुख नगर बिलोली यांच्या वतीने दिवाळीनिमित्त दि.८ व ९ नोव्हेंबर रोजी दिवाळी पहाट, गीत गायन स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सर्वांनी या गीत गायनाच्या कार्यक्रमाचा तसेच विविध स्पर्धांचा आनंद घ्यावा लाभ घ्यावा.

दिनांक ८ नोव्हेंबर रोजी सकाळी सहा वाजता दिवाळी पहाट शिवाजी मोकळे आणि संच धर्माबाद तसेच गीत गायन स्पर्धा व ९ नोव्हेंबर रोजी सकाळी नऊ ते अकरा रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या दोन्ही स्पर्धेतील स्पर्धकांना अनुक्रमे १५०१, १००१, ७०१ व ५०१ रुपयांचे नगदी पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येतील सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गोपाळ चौधरी बिलोली हे करणार आहेत. आपली नाव नोंदणी पवन किराणा स्टोअर्स देशमुख नगर मंदिराच्या बाजूला यांच्याकडे दिनांक सात नोव्हेंबर पर्यंत करावी असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

इफ्को टोकियो विमा कंपनीचा मनमानी कारभार; हजारो शेतकऱ्यांचे अर्ज 'रिव्हर्ट', जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

भोकर । एजास कुरेशी

खरीप हंगाम २०२६ मधील पीक विम्यावरून 'इफ्को टोकियो' पीक विमा कंपनीने अचानक जाचक अटी लादल्याने शेतकरी आणि सीएससी व्हीएलई (उडउ तडए) धारक तीव्र संकटात सापडले आहेत. सुरुवातीला ऐच्छिक असलेला सातबारा (७/१२) उतारा अपलोड करणे आता अचानक सक्तीचे करण्यात आले असून, यामुळे शेतकरी व केंद्र चालकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. या मनमानी कारभाराविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी आम आदमी पक्षाचे तालुका समन्वयक सय्यद अलमास यांनी निवेदनाद्वारे केली

विमा कंपनीकडून हजारो फॉर्म 'रिव्हर्ट'

खरीप हंगामाचा पीक विमा भरताना सुरुवातीला केवळ बँक पासबुक अपलोड करणे बंधनकारक होते आणि सातबारा उतारा देणे ऐच्छिक ठेवण्यात आले होते. मात्र, आता विमा कंपनीने अचानक आपला निर्णय बदलून मंजुरीच्या प्रक्रियेत असलेले हजारो अर्ज थेट 'रिव्हर्ट' (प्रलंबित) केले आहेत. हे अर्ज पुन्हा मंजूर करण्यासाठी सातबारा उतारा अपलोड करण्याची अट घालण्यात आली आहे.



शासकीय संकेतस्थळ ठप्प; शेतकरी हवालदील

विमा कंपनीने सातबारा सक्तीचा केला असला, तरी दुसरीकडे भूमी अभिलेखाची 'महाभुलेख' ही शासकीय वेबसाईट मागील काही दिवसांपासून अत्यंत संथ गतीने चालत आहे किंवा पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपला सातबारा उतारा काढणे अशक्य झाले असून, आधीच दुष्काळ आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे होरपळलेला शेतकरी आता या तांत्रिक अडचणीमुळे अधिकच मानसिक तणावाखाली आला आहे.केंद्र चालकांची नाहक बदनामी आणि 'आयडी' ब्लॉकचा प्रश्न विमा कंपनीच्या या धोरणामुळे ग्रामीण भागातील सामान्य शेतकऱ्यांमध्ये असा गैरसमज पसरत आहे की, सीएससी केंद्र चालकांनी फॉर्म भरताना चूक केली आहे. यामुळे शेतकरी आणि केंद्र चालकांमध्ये वादाचे प्रसंग निर्माण होत असून, दिवस-रात्र सेवा देणाऱ्या व्हीएलई धारकांची नाहक बदनामी होत आहे. तसेच, मागील काही दिवसांत विविध तांत्रिक व प्रशासकीय कारणांमुळे अनेक सीएससी धारकांचे 'लॉगिन आयडी' बंद करण्यात आले आहेत. आयडी बंद असल्यामुळे या केंद्र चालकांना आता शेतकऱ्यांचे सातबारे अपलोड कसे करावेत, असा यक्षप्रश्न पडला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान होईल, त्याला जबाबदार कोण? असा सवाल केंद्र चालकांनी उपस्थित केला आहे.

जाचक अटी तातडीने रद्द करण्याची मागणी

इफ्को टोकियो कंपनीने अचानक लावलेला हा सातबारा अपलोड करण्याचा घोळ पूर्णपणे चुकीचा आणि अन्यायकारक आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी या विषयात तातडीने हस्तक्षेप करावा, विमा कंपनीने लावलेली सातबारा अपलोड करण्याची अट तात्काळ शिथिल करावी आणि शेतकरी व सीएससी धारकांना न्याय मिळवून द्यावा, अशी आग्रही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी सुरज नागलवाड, शोएब भाई, सय्यद नासेर सहित आर्दिंची उपस्तिथी होती.

कुंडलवाडीत माजी मंत्री खतगावकर यांच्या हस्ते व्हीपीके पतसंस्थेच्या शाखेचे उद्घाटन

कुंडलवाडी । प्रतिनिधी

सहकार क्षेत्रातून विश्वासार्हता आणि आर्थिक स्वावलंबनाचा आदर्श निर्माण करणाऱ्या व्हीपीके पतसंस्थेच्या कुंडलवाडी शाखेचा रौप्य महोत्सवी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर यांच्या शुभहस्ते शाखेचे भव्य उद्घाटन करण्यात आले. ही शाखा संस्थेची २५ वी शाखा असून सन २००२ पासून संस्थेने विश्वास आणि पारदर्शकतेच्या बळावर उल्लेखनीय प्रगती केली आहे. शेतकरी, व्यापारी, महिला आणि सर्वसामान्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम संस्था करते.



यावेळी बोलताना माजी मंत्री खतगावकर म्हणाले, कवळे गुरुजींनी लावलेले छोटेसे रोपटे आज वटवृक्ष झाले आहे, याचा सार्थ अभिमान वाटतो. त्यांच्या मनातील सर्वसामान्य माणसाच्या विकासाची तळमळ मी जवळून पाहिली आहे. व्यापारी बांधवांनी या संस्थेला बळ द्यावे. अध्यक्षीय भाषणात मारोतराव कवळे गुरुजी म्हणाले, ही संस्था माझी नसून गोरगरीब माणूस हा खरा मालक आहे. मी नाममात्र चेअरमन आहे. मी कोणतेही मानधन घेत नाही. राजकारणविरहित राहून गरिबांना मदत करणे हाच माझा उद्देश आहे. या सोहळ्याला संत मना महाराजांचे आशीर्वाद लाभले. यावेळी नगराध्यक्षा सौ.प्रेरणाताई कोटलावार, शीतलताई अंतापुरकर, बाबाराव भाले, साईनाथ उत्तरवार, गणेशराव पाटील सरसे, मुख्य कार्यकारी अधिकारी गणेशराव चाटे, सचिव नागनाथ पांचाळ, शाखा व्यवस्थापक कृष्णा रामगीरवार आदींसह व्यापारी, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर नगरपरिषद सभागृहात आणि नगराध्यक्षा प्रेरणाताई कोटलावार यांच्या निवासस्थानी कवळे गुरुजींचा सत्कार करून शहर विकासावर चर्चा करण्यात आली. तसेच सोसायटीचे मा.चेअरमन साईनाथ सेठ, जेष्ठ नगरसेवक उत्तरवार, राजेश्वर उत्तरवार यांच्या निवासस्थानी गुरूजी सदिच्छा भेट दिली असता उत्तरवार परिवारातर्फे गुरूजीचा सत्कार करण्यात आला. यावेळी न.प.मुख्याधिकारी जाधव, उपनगराध्यक्षा प्रतीनिधी शैलेश यांकावार, गटनेते रमेश ईरलावार, नगरसेवक प्रशांत सब्बनवार, सचिन कोटलावार, शिनू गोणेलवार, पत्रकार मोहम्मद अफजल, नरेंद्र येरावार, लक्ष्मण होरके सर, नगरसेवक प्रतिनिधी संजय खुळगे, नसिर काझी, गोविंदराज उत्तरवार आदी उपस्थित होते.

महर्षी मार्कंडेश्वर ऋषी मंदिराच्या सभामंडपाचे आ. जितेश अंतापूरकर यांच्या हस्ते भूमिपूजन

आमदारांनी दिलेला शब्द पाळला; समाजबांधवांत समाधानी, बोरवेललाही तात्काळ मंजुरी

देगलूर । अजीम अन्सारी

मदनूर रोड, देगलूर येथील महर्षी मार्कंडेश्वर ऋषी मंदिर परिसरात सभामंडप बांधकामाचा भूमिपूजन सोहळा आमदार जितेशभाऊ अंतापूरकर यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. अनेक दिवसांपासून समाज बांधवांकडून मंदिर परिसरात सभामंडप उभारण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. यावेळी आमदार अंतापूरकर यांनी समाज बांधवांना दिलेला शब्द पाळत सभामंडपासाठी निधी उपलब्ध करून दिल्याने समाज बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या कार्यक्रमात भाजप शहरअध्यक्ष प्रशांत दासरवार यांनी मनोगत व्यक्त करताना सर्वप्रथम आमदार अंतापूरकर यांचे समाज बांधवांच्या वतीने आभार मानले. तसेच सभामंडपाच्या बांधकामासाठी आगामी काळात आणखी निधी मंजूर करावा, मंदिर परिसरात विद्युत ट्रान्सफॉर्मर बसवून द्यावा, बोरवेलची व्यवस्था करावी तसेच मंदिराकडे जाणारा रस्ता तयार करून द्यावा, अशा विविध मागण्या आमदार अंतापूरकर यांच्याकडे मांडण्यात आल्या. यावर सकारात्मक प्रतिसाद देत आमदार अंतापूरकर यांनी आपल्या मनोगतात बोरवेलसाठी तात्काळ मंजुरी देण्याची घोषणा केली. तसेच सभामंडपासाठी आवश्यक अतिरिक्त निधी आणि ट्रान्सफॉर्मर, रस्ता यांसारखी उर्वरित विकासकामेही टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आमदारांनी दिलेला शब्द पूर्ण करून समाजाच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल उपस्थित समाज बांधवांनी त्यांचे आभार व्यक्त केले. महर्षी मार्कंडेश्वर ऋषी मंदिराच्या विकासासाठी मिळालेली ही मदत समाजासाठी निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार असून, सभामंडपामुळे भविष्यात धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी हक्काची सुविधा उपलब्ध होणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यास माजी सभापती शिवाजीराव देशमुख बळेगावकर, माजी नगराध्यक्ष शंकरराव कन्तेवार, नगराध्यक्ष प्रतिनिधी बालाजीराव टेकाळे, उपनगराध्यक्ष ड.अंकुश देसाई देगावकर, अशोकराव साखरे, मंडळ अध्यक्ष शिवकुमार देवाडे, प्रकाश शेठ अमृतवार, माजी सरपंच सुरेश भाऊ मिसाळे, सूर्यकांत दासरवार, भूमन्ना चिलवरवार, नारायण अण्णा उपलंचवार, लच्छीराम अन्नमवार, संजीव पांचाळ, गंगाधर दाउलवार, दीपक संगमकर, भावना दाशेटवार, लक्ष्मण अमृतवार, सुरेश चिलवेरी, मुकुंद भुताळे, सुरेश नकावार, उमाकांत मुंडकर, प्रदीप सक्करगे, कंत्राटदार अमितकुमार कोटलवार, शंकरराव गायकवाड, गुरूपवार साहेब, बालाजी आडेपवार, संजय रचावार, अनिल सुरकुटलावार, किरण क्यातमवार, बेतीवार ताई, गुजरवार सर, गुंडावार सर, चिल्कावार सर, सूरकुठलावार सर, शिवराम चिंतावार सर, लक्ष्मण आनलदास, सचिन कांबळे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

कलंबर (बु.) येथे श्री. संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

उस्माननगर । माणिक भिसे

येथून जवळच असलेल्या मौजे कलंबर (बु.) ता. लोहा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही हिमवंत वैराग्य पिठाधीश श्री.श्री.श्री. १००८ जगद्गुरु भीमाशंकर महास्वामीजी शिवाचार्य रत्न श्री. ष. ब्र. प्र. षडाक्षरी शिवाचार्य महाराज यांच्या सान्निध्यात हा मंगलमय सोहळा दि.६ नोव्हेंबर २०२६ ते दि.१४ नोव्हेंबर २०२६; दरम्यान कलंबर बु. नगरीत भक्तिमय वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये श्री संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि रक्तदान शिबीर, भव्य पशु प्रदर्शन, श्रम शिबीर तसेच केएएल क्रिकेट सामने आयोजीत करण्यात आले आहेत.

कलंबर बु. ता.लोहा येथील व पंचक्रोशीत जाज्वल्य देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त दरवर्षी प्रमाणे यंदाही यात्रा कमिटी व ग्रामस्थ यांच्या संकल्पनेतून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यामध्ये पहाटे ४ ते ५ काकडा भजन, सकाळी ९ ते ११ गाथा भजन, दुपारी १२ ते ४ महीला भजन, सायंकाळी ५ ते सहा हरिपाठ आदी कार्यक्रम होणार आहेत. मिती कार्तिक शु. तृतीया दि. १२ नोव्हेंबर रोजी गुरूवारी सायंकाळी ७ वा. अग्नी पुजा करून प्रज्वलित करण्यात येईल. रात्रभर संगीत भजनांचा दणदणीत कार्यक्रम होईल. मिती कार्तिक शुद्ध ४ चतुर्थी दि.१३ नोव्हेंबर २०२६ रोज शुक्रवारी सकाळी पाच वाजता अग्नीतुन पालखी प्रवेश सोहळा व श्री संत अगडंमबुवा महाराज यांच्या पालखीची भव्य मिरवणूक टाळ मृदंग वीणा, ढोल ताशांच्या गजरात गावातील प्रमुख रस्त्याने मिरवणूक काढण्यात येईल. त्यानंतर ११ ते १ काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे. श्री. संत अगडंमबुवा महाराज यांच्या यात्रेनिमित्त रक्तदान हेच श्रेष्ठ दान यात्रा कमिटी व ग्रामस्थ तरूण मंडळ तसेच श्री. जिजाऊ ब्लड बँक शिवाजीनगर, नांदेड यांच्या संकल्पनेतून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन दि.१२ नोव्हेंबर रोज गुरूवारी सकाळी १० वा. जिल्हा परिषद हायस्कूल कलंबर बु. येथील प्रांगणात आयोजित करण्यात आले आहे. तरी परिसरातील रक्तदात्यानी सदरील रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

कलंबर बु. येथील श्री संत अगडंमबुवा महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह दरम्यान रात्रीच्या वेळी नामवंत, विनोदीचर्य किर्तनकार यांच्या किर्तनाचे आयोजन केले आहे. यामध्ये दि.६ नोव्हेंबर शुक्रवारी ह.भ.प. माधव महाराज कोंडलवाडे, दि.७ नोव्हेंबर रोज शनिवारी रात्री ह.भ.प. दिपक महाराज शेवरे, दि.८ नोव्हेंबर रोज रविवारी किर्तनकार म्हणून ह.भ.प. ज्ञानोबा माऊली वने महाराज, दि.९ नोव्हेंबर रोज सोमवारी रात्री किर्तनकार म्हणून ह.भ.प. नामदेव महाराज दापकेकर, दि.१० नोव्हेंबर रोज मंगळवारी रात्री किर्तनकार म्हणून ह.भ.प. निवृत्तीनाथ महाराज इसादकर, दि.११ नोव्हेंबर रोज बुधवारी रात्री किर्तनकार म्हणून ह.भ.प. भगवान महाराज शेरेकर, दि.१२ नोव्हेंबर रोज गुरूवारी रात्री किर्तनकार म्हणून ह.भ.प. विलास महाराज गेजगे, दि.१३ नोव्हेंबर शुक्रवारी सकाळी काल्याच्या किर्तनाचे आयोजन केले आहे. यावेळी ह.भ.प. राजेश पाटील बिदरकर यांच्या काल्याचे किर्तन संपल्यावर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी परिसरातील भाविक भक्तांनी कलंबर बु येथील श्री संत अगडंमबुवा महाराज यांच्या यात्रेनिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन समस्त गावकरी मंडळी कलंबर बुद्रुक, भोपळवाडी, आबादी मोकलेवाडी तालुका लोहा येथील ग्रामस्थांनी केले आहे.

कलंबर बु. ता.लोहा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री संत अगडंमबुवा यात्रेनिमित्त पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद नांदेड, पंचायत समिती लोहा, ग्रामपंचायत कार्यालय कलंबर बुद्रुक, सेवा सहकारी सोसायटी लि कलंबर बु. ता. लोहा व समस्त गावकरी मंडळी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १२ नोव्हेंबर २०२६ गुरुवारी भव्य पशुप्रदर्शन आणि श्रम शिबिर दिनांक १३ नोव्हेंबर शुक्रवारी आयोजित करण्यात आले आहे.

या प्रदर्शनात उत्तम जातीच्या लाल कंधारी व संकरित जातीच्या जनावराची निवड करून भव्य बक्षीस मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. या पशुप्रदर्शन शिबिराची नोंदणी पशुवैद्यकीय दवाखाना कलंबर बुद्रुक येथे सकाळी त्याच दिवशी सात ते दहा वाजेपर्यंत करण्यात यावे असे पशुपालकांना आव्हान करण्यात येत आहे. पशुप्रदर्शन व श्रम शिबिरात परिसरातील पशुपालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा असे आव्हान यात्रा कमिटी व ग्रामस्थ यांनी केले आहे.

दैनिक जगमित्र कार्यालय, ९-२-३४६, बिलाल नगर, दैगलूर नाका, इतवारा, नांदेड

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — बुधवार दि.०४ नोव्हेंबर २०२६ — पान नं.५




दुष्काळग्रस्त शेतकरी व दुष्काळग्रस्त भागासाठी काम करु : डॉ. अजय जाधव

लातूर । प्रतिनिधी

राज्य केमिस्ट संघटना ही जवळपास एक लाख सभासद असलेली मोठी संघटना असून डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील दुवा म्हणून केमिस्टचे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. केवळ उद्योग, व्यापार, सेवा, व्यवसाय एवढ्यापुरते मर्यादित न राहता सामाजिक दायित्व म्हणून येत्या काळात दुष्काळग्रस्त शेतकरी आणि दुष्काळग्रस्त भागासाठी डॉक्टर संघटना, केमिस्ट संघटना, शैक्षणिक क्षेत्रासह सर्वच घटकातील संघटनांनी एकत्रित येऊन काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन श्री शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजय जाधव यांनी केले. लातूर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रामदास भोसले यांच्या सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

राज्य केमिस्ट संघटनेच्या उपाध्यक्षपदी लातूरचे सुप्रसिद्ध केमिस्ट रामदास भोसले यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. सत्कार सोहळ्यास महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, व्यापारात संघटन असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. लाखो सभासद एकसंघपणे, एका विचाराने काम करतात हे खूप मोठी ताकद आहे. केमिस्ट संघटनेने ही एकजूट कायम जपली आहे.



लातूर जिल्हा व सर्व तालुका केमिस्ट संघटनेच्या वतीने रामदास भोसले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून सपत्नीक सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर औराद व्यापारी महासंघ, वैद्यकीय व्यवसायातील विविध प्रतिनिधी, सामाजिक संघटना यांच्यावतीनेही त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्री मारवाडी शिक्षण संस्थेचे सचिव ड.आशिष बाजपाई, विश्वनाथअप्पा निगुडगे, कुन्नरिया, डॉ. सतीश बिराजदार, डॉ. राजेंद्र दराडे, विष्णू कलंत्री, मल्लिकार्जुन लातुरे, अरुण सोमाणी, अतुल कोटलवार, अनिल स्वामी, ओम बाहेती, सत्यवान बोरळकर, ईश्वर बाहेती, बालाजी थेटे, रमेश भांगडिया, अंकुश भोसले, नागेश स्वामी, प्रकाश रेड्डी, रमाकांत बुरकापल्ले, श्रीकांत वाघमारे, संजय भालकीकर, उद्धव मळ्ळेशे, अरविंद बिरादार, प्रकाश गंडेवार, संगमेश्वर निला, तानाजी सुरवसे, नाथराव मुंडे, वंदना दरक, विलास माने आदी मान्यवरांसह जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील केमिस्ट बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

औसा उपविभागाच्या नूतन युवा महिला उपविभागीय पोलिस अधिकारी अरांक्षा यादव यांची नियुक्ती

औसा । बी.डी. उबाळे

पोलीस उपविभागीय कुमार चौधरी यांची नुकतीच नाशिकला बदली झाली असून त्यांच्या ठिकाणी युवा आयपीएस अरांक्षा यादव यांची नुकतीच प्रशासकीय आदेशाने नियुक्ती झाली आहे. औसा पोलीस उपविभागीय अधिकारी म्हणून २०२३ बॅचच्या युवा आयपीएस अधिकारी अरांक्षा यादव यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे औसा उपविभागाला युवा महिला आयपीएस अधिकाऱ्याचे नेतृत्व मिळणार आहे.

अरांक्षा यादव यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२२ मधील नागरी सेवा परीक्षेत देशात २०१ वा क्रमांक मिळवला होता. मूळच्या हरियाणातील असलेल्या यादव यांचे दिल्लीतील सेंट स्टीफन्स महाविद्यालयात पदवीचे शिक्षण झाले. त्यानंतर जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून त्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेतल्याची माहिती आहे. स्पर्धा परीक्षेतील यशाच्या जोरावर त्यांनी भारतीय पोलीस सेवेत स्थान मिळविले. सुरुवातीला त्यांना गुजरात केडर मिळाले होते. मात्र, महाराष्ट्र केडरचे २०२१ बॅचचे आयपीएस अधिकारी अनमोल मित्तल यांच्याशी विवाह झाल्यानंतर केंद्र सरकारने जून २०२५ मध्ये त्यांची गुजरातमधून महाराष्ट्र केडरमध्ये बदली मंजूर केली. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र पोलीस दलात सेवा सुरू केली.



कोल्हापूर येथे अतिरिक्त पोलीस अधीक्षक म्हणून प्रशिक्षणार्थी कार्यकाळात त्यांनी अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधातील कारवायांमध्ये सहभाग घेतला. त्यानंतर रत्नागिरी येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून काम करताना अंमली पदार्थांविरोधातील कारवाईबरोबरच जनजागृतीवरही भर दिला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये नशामुक्ती अभियान राबवून तरुणांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. गोवा बनावटीच्या अवैध दारू तस्करीविरोधातील कारवायांमध्येही त्यांनी सहभाग घेतल्याचे वृत्त आहे. आता औसा उपविभागाची जबाबदारी स्वीकारताना त्यांच्यासमोर विविध आवाहने असणार आहेत. ग्रामीण भागातील अवैध धंदे, मटका, गुटखा-जुगार, अवैध दारू विक्री, वाळू तस्करी, अंमली पदार्थांची विक्री, महिला व बालकांची सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था या प्रश्नांवर त्यांना लक्ष केंद्रित करावे लागणार आहे.

नियती ठाकर नंतर दुसऱ्या धाडसी (सिंघम) आयपीएस महिला अधिकारी

२०१३-१४ मध्ये आयपीएस नियती ठाकर यांनी औसा उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून काम पाहिले होते. श्रीमती ठाकर यांनी तालुक्यातील सर्व अवैध धंदे, भाईगिरी, मटका, अवैध दारू विक्री यासह महिलांच्या सुरक्षे संदर्भात कडक पावले उचलली होती. त्यांनी आपल्या कार्यकाळात संपूर्ण पोलीस यंत्रणा सक्रिय करून लोकांमध्ये पोलीस प्रशासनाची एक वेगळी ओळख निर्माण केली होती. यावेळी औसा तालुक्यात होणारे खून, रोज होणाऱ्या मारामाऱ्या, चाकू, कोयत्याने हल्ले, सर्रास हॉटेल आणि धाब्यावर मिळणारी दारू, चोऱ्या, शहरात आणि परिसरातील लॉजवर चालणारे विना परवाना, परवाना धारक काळे धंदे मोठ्या संख्येने बोकाळले आहेत. लोकांचा पोलिसावरचा उठत चाललेला विश्वास याला प्राधान्य देऊन काम करण्याचे मोठे आवाहन नूतन पोलीस अधिकारी श्रीमती यादव यांच्यासमोर असणार आहे. कुमार चौधरी यांच्या बदलीनंतर औसा उपविभागाची धुरा नव्या अधिकाऱ्यांकडे जाणार आहे. युवा महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या नियुक्तीमुळे औसा पोलीस प्रशासनाच्या आगामी कामकाजाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सहाय्यक फौजदार मधुकर लांडगे मेजर सेवानिवृत्त; मित्रपरिवाराकडून सन्मानपूर्वक सत्कार

लातूर । संतोष सोनवणे

पोलीस विभागात तब्बल ३८ वर्षे प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवा बजावणारे सहाय्यक फौजदार मधुकर लांडगे मेजर हे ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवाकार्याचा गौरव करण्यासाठी मित्रपरिवाराच्या वतीने लातूर येथे त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. लांडगे मेजर यांनी पोलीस सेवेत गांधी चौक पोलीस ठाण्यात सलग पाच वर्षे उत्कृष्ट कामगिरी बजावली. तसेच डीव्ही (ऊत) कारवरही उल्लेखनीय सेवा दिली.

पोलीस सेवेत येण्यापूर्वी त्यांनी भारतीय सैन्यदलात हिमालयाच्या दुर्गम भागात देशसेवेचे कर्तव्य पार पाडले होते. सैन्यदलातील शिस्त, प्रामाणिकपणा आणि देशभक्तीचा वारसा त्यांनी पोलीस सेवेतही जपला. या सत्कारप्रसंगी माजी पोलीस उपनिरीक्षक (झडख) कवाळे साहेब यांच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी दैनिक जगमित्रचे जिल्हा प्रतिनिधी व मित्र संतोष सोनवणे तसेच ड. विनोद धुमाळ उपस्थित होते. ३८ वर्षांच्या सेवाप्रवासात कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभाव जपणाऱ्या लांडगे मेजर यांना पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व सुखसमृद्धी लाभो, अशा शुभेच्छा मित्रपरिवाराने दिल्या.



डॉ. दिलीप नागरगोजे यांची 'आयडॉल शिक्षक' म्हणून निवड

लातूर । प्रतिनिधी

शैक्षणिक, संशोधन आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नामदेव नागरगोजे यांची महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यामार्फत 'आयडॉल शिक्षक' म्हणून निवड करण्यात आली आहे.

डॉ. दिलीप नागरगोजे हे १९९५ पासून दयानंद कला महाविद्यालयात तत्त्वज्ञान विषयाचे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक म्हणून कार्यरत असून, २०१९ पासून पर्यवेक्षक आणि २०२२ पासून उपप्राचार्य पदाची जबाबदारी ते समर्थपणे सांभाळत आहेत. अध्यापनात सातत्यपूर्ण नावीन्य आणत त्यांनी इयत्ता अकरावी व बारावीच्या तत्त्वज्ञान विषयाच्या जुन्या व नवीन अभ्यासक्रमावरील सर्व प्रकरणांचे स्वतःचे शैक्षणिक व्हिडिओ तयार करून YouTube आणि 'दीक्षा' पोर्टलवर उपलब्ध करून दिले आहेत. त्यांच्या या डिजिटल शैक्षणिक साहित्याचा लाभ महाराष्ट्रातील असंख्य विद्यार्थ्यांना होत आहे.



लेखन व संशोधन क्षेत्रातही त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी आतापर्यंत एकूण ११ ग्रंथांचे लेखन केले असून, त्यापैकी एका ग्रंथाचा समावेश राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात, तर दुसऱ्या एका ग्रंथाचा समावेश स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या पदवी अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. तसेच त्यांचे ४० हून अधिक संशोधन निबंध विविध नियतकालिके व संशोधन मंचांवर प्रकाशित झाले आहेत. गतवर्षी आयआयटी मुंबई येथे आयोजित 'इंडियन फिलॉसॉफी काँग्रेस'च्या शंभराव्या अधिवेशनात त्यांचा संशोधन निबंध प्रकाशित होणे ही त्यांच्या संशोधन कार्यातील महत्त्वाची उपलब्धी मानली जाते.

अध्यापनातील नावीन्यपूर्ण प्रयोग, डिजिटल साहित्यनिर्मिती, ग्रंथलेखन आणि सामाजिक प्रतिबद्धतेच्या बळावर मिळालेल्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर, ज्येष्ठ अधिव्याख्याता विजयकुमार सायगुंडे, श्रीमती सुहासिनी देशमुख, श्रीमती योगेश्वरी नाडे, घनश्याम पौळ, अनिल जाधव, गिरीश माने, लातूर पंचायत समितीचे बी.आर. शेख, विशाल लामतुरे, माजी उपप्राचार्य अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. गोपाल बाहेती, डॉ संदिपान जगदाळे, प्रा. जीगाजी बुद्रुके, स्टाफ सचिव प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. दशरथ ननवरे, डॉ. सुधीर गाडवे, प्रा. महेश जंगपल्ले आणि कार्यालयीन अधीक्षक संजय व्यास आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेस पात्र मुलींच्या हॉकी संघाला माझं लातूर परिवाराचे पाठबळ

जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते खेळाडूंना हॉकी स्टिक प्रदान

लातूर । प्रतिनिधी

लातूर तालुक्यातील बिंदगीहाळ येथील हनुमान विद्यालयाच्या शालेय मुलींच्या हॉकी संघास माझं लातूर परिवाराच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ भारत बास्टेवाड यांच्या हस्ते हॉकी स्टिकचे वितरण करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झालेल्या सोहळ्यात हनुमान विद्यालयाचा शालेय मुलींचा संपुर्ण हॉकी संघ, माझं लातूर परिवाराचे सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, क्रीडा प्रशिक्षक यांची प्रमुख उपस्थिती होती.

ग्रामीण भागातील ध्येयवादी आणि होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी माझं लातूर परिवाराने हा उपक्रम हाती घेतला आहे. यापूर्वीही १७ सप्टेंबर २०१७ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी जी श्रीकांत यांच्या हस्ते तर १३ सप्टेंबर २०२३ रोजी तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या हस्ते खेळाडूंना हॉकी प्रदान करण्यात आल्या होत्या. आतापर्यंत या शाळेतील ३ मुलींनी राष्ट्रीय पातळीवर तर तब्बल २२० च्या वर मुलींनी राज्यस्तरावर लातूरचे प्रतिनिधित्व केले आहे. बुलढाणा येथे होत असलेल्या राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेसाठी हा संघ पात्र ठरला असून या सर्व खेळाडूंना जिल्हाधिकारी डॉ भारत बास्टेवाड यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. याप्रसंगी माझं लातूर परिवाराचे सतीश तांदळे, दीपरत्न निलंगेकर, डॉ सितम सोनवणे, रत्नाकर निलंगेकर, काकासाहेब शिंदे, अमर करकरे, काशीनाथअप्पा बळवंते यांची उपस्थिती होती.



ग्रामीण भागातील या होतकरू खेळाडूंना शासनाच्या वतीने क्रीडा साहित्य आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशा मागणीचे निवेदन यावेळी परिवाराच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत यासाठी शासन स्तरावर मदत मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन पाठपुरावा करेल असे आश्वासन डॉ भारत बास्टेवाड यांनी माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळास दिले.

पत्रकार बाबासाहेब काळे यांना 'राजर्षी शाहू महाराज पुरस्कार' प्रदान

पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल; मान्यवरांच्या हस्ते गौरव

लातूर । प्रतिनिधी

लातूर तालुक्यातील बोरगाव काळे येथील रहिवासी तथा पत्रकार बाबासाहेब हणमंत काळे यांना पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल 'राजर्षी शाहू महाराज पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. माटेफळ येथील संस्थापक अध्यक्ष बापू खोसे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंचाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. लातूर जिल्हा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, ॲड. अण्णाराव पाटील, श्रीमती पंचशीला डावकर आणि जिल्हा परिषद सदस्य सूरज शिंदे यांच्या हस्ते बाबासाहेब काळे यांचा सन्मानचिन्ह व पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.



पत्रकार बाबासाहेब काळे यांनी अल्पावधीतच पत्रकारिता क्षेत्रात आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळी परिस्थिती, सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या, सामाजिक उपक्रम तसेच अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे काम त्यांनी आपल्या लेखणीतून सातत्याने केले आहे. केवळ बातम्या प्रसिद्ध करण्यापुरते मर्यादित न राहता, पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवून ते सोडविण्यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला आहे. पत्रकारितेसोबतच सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग असून समाजातील वंचित, गरजू आणि शेतकरी बांधवांच्या प्रश्नांबाबत ते नेहमीच संवेदनशील राहिले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत राजर्षी शाहू महाराज सामाजिक दायित्व मंचाने त्यांना पुरस्काराने गौरविले.

नांदेडमध्ये 'बालरंगभूमी परिषद' शाखा स्थापनेसाठी ४ नोव्हेंबरला महत्त्वपूर्ण बैठक

देगलूर । अजीम अन्सारी

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेशी संलग्न बालरंगभूमी परिषदेची नांदेड येथील शाखा स्थापनेसंदर्भात मध्यवर्ती कार्यालय मुंबईने नियुक्त केलेल्या निरीक्षण समितीची महत्त्वाची बैठक नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलेजच्या सभागृहात ४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वा. आयोजित करण्यात आली आहे. नाट्यसंस्कृतीला पोषक वातावरण असलेल्या नांदेड जिल्ह्यात आजपर्यंत बालरंगभूमीची शाखा नसल्याने स्थानिक नाट्य कर्मींनी परिषदेकडे याबाबत अर्ज केला होता. त्याची दखल घेत बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा ॲड. नीलम शिर्के सामंत यांनी स्थानिक अर्जदार नाट्यकर्मी राजेश महाराज देगलूरकर यांना पत्र पाठवून शाखा स्थापनेसंदर्भात निरीक्षकांची नियुक्ती केल्याचे कळवले आहे.

यामध्ये निरीक्षक म्हणून बालरंगभूमी परिषदेचे मार्गदर्शक गोविंद गोडबोले, उपाध्यक्ष शैलेश गोजमगुंडे व कार्यकारिणी सदस्य त्र्यम्बक वडसकर येणार आहेत. या बैठकीला सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणारे तसेच नाट्यकर्मी व नाट्यरसिक, संगीत प्रेमी नृत्य रसिक यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राजेश महाराज देगलूरकर, मनीष देशपांडे, अपर्णा नेरलकर यांनी केले आहे.

उदयगिरी महाविद्यालयाच्या तीन खेळाडूंची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी निवड

उदगीर । पाटील मनेश

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथील खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले असून, महाविद्यालयाच्या कु. वैष्णवी राठोड, कु. साक्षी कोरे आणि गजानन जाधव या तीन खेळाडूंची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या क्रॉस कंट्री संघात निवड झाली आहे. या खेळाडूंनी विद्यापीठाच्या संघात स्थान मिळविल्यामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.


दिनांक ६ ते ७ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत मंगळूर विद्यापीठ, मंगळागंगोथ्री यांच्या अंतर्गत गव्हर्नमेंट फर्स्ट ग्रेड कॉलेज, क्रोडाश्रमा, उडुपी (कर्नाटक) येथे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉस कंट्री (१० कि.मी. धावणे) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा संघ नांदेड येथून स्पर्धास्थळाकडे रवाना झाला आहे. या संघामध्ये महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या वरील तीन खेळाडूंचा समावेश असून, ते विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.



या खेळाडूंना महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. सतीश मुंढे व प्रा. रमजू शेख यांचे मार्गदर्शन लाभले आहे. खेळाडूंच्या या यशाबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस.एन. हल्ळाळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

चि. राघव भुषण सोमाणी याचे यश; मराठवाड्यातून प्रथम

लातूर । प्रतिनिधी



श्री हरिकिशनजी बजाज मेमोरियल ट्रस्ट संचलित माहेश्वरी शिक्षण विकास संस्था नांदेड यांचे कडून माहेश्वरी टॅलेंट सर्च २०२६ हि मराठवाडा स्तरीय परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत लातूर मधील नामांकित व्यक्तीमत्व लक्ष्मीकांतजी सोमाणी यांचे नातू चि. राघव भुषण सोमाणी याने मराठवाड्यातून प्रथम क्रमांक मिळवला आहे. सदरील बाब हि माहेश्वरी समाजासोबत समस्त लातूरकरांसाठी देखील अभिमानास्पद आहे. या यशाबद्दल चि. राघव भुषण सोमाणी याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

शालेय राज्यस्तरीय रोल बॉल स्पर्धेसाठी समिट इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची निवड



लातूर । संतोष सोनवणे

लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षांखालील शालेय विभागीय रोल बॉल स्पर्धेत समिट इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय रोल बॉल स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. या स्पर्धेत समिट इंटरनॅशनल स्कूलच्या संघाने शानदार खेळाचे प्रदर्शन केले. संघाचा कर्णधार आदित्य मोरे याने तब्बल ९ गोल नोंदवत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. त्याच्या उत्कृष्ट खेळामुळे संघाला विजय मिळवून राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश मिळवता आला.

या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आदित्य मोरे, कारुण्य आंबुलगे, सूर्यांश काणेकर, सय्यद सौद, आदित्य चित्ते, रौनक तापडे, अमानत पटेल, स्वराज मोरे आणि हर्षवर्धन डोंगरे यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन दिलीप माने, अध्यक्ष दिनेश माने, संचालिका सौ. सोनल दिनेश माने, प्राचार्य बिनू जेकब, उपप्राचार्य विक्रम माने व सौ. रेखा नवनंदर, समन्वयक अलिशा रॉय, डमिन मॅनेजर विक्रम मिगलानी तसेच क्रीडा शिक्षक अबू चाऊस, रंजीत राठोड, पूजा तोडकरी आणि रोल बॉल प्रशिक्षक सय्यद लायक यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. समिट इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

बद्रीनारायण घुगे (पुणे जिल्हा प्रतिनिधी)
मो.9922476927 PRGI.No.- MHMAR/26/A4099

पुणे जिल्हा आवृत्ती — बुधवार दि.०४ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ६

प्रेयसीच्या होकारासाठी मद्यधुंद तरुण चढला १०० फूट उंच मोबाईल टॉवरवर

पिंपरी । प्रतिनिधी

प्रेयसीसोबत किरकोळ कारणावरून वाद झाला अन् मद्यधुंदावस्थेतील प्रेमवीर थेट शंभर फूट उंच मोबाईल टॉवरवर जाऊन बसला. खाली उतरण्यासाठी पोलिस, अग्निशामक दल आणि नातेवाइकांनी विनवण्या केल्या; मात्र पठ्ठ्या काही ऐकायला तयार नव्हता. अखेर प्रेयसीला हातात हार घेऊन लग्नासाठी होकार द्यायला लावण्यात आला.

त्यानंतरच प्रेमवीराने खाली उतरण्याची तयारी दर्शविली. हा प्रकार मामुर्डी येथे घडला. या प्रेमनाट्यामुळे पोलिस आणि अग्निशामक दलाची तब्बल पावणेचार तास दमछाक झाली. उबेदुल्ला शेख (वय २२, मूळ रा. धुबरी, आसाम) असे या तरुणाचे नाव आहे. मामुर्डी येथील गोदरेज कंपनीच्या टाऊनशिपमधील व्होडाफोनच्या लोखंडी टॉवरवर तो दुपारी साडेतीनच्या सुमारास चढला होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उबेदुल्लाचे शेजारी राहणाऱ्या तरुणीसोबत प्रेमसंबंध आहे. दोघांमध्ये किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यानंतर मद्यधुंदावस्थेत त्याने थेट मोबाईल टॉवर गाठला. सुमारे शंभर फूट उंचीवर जाऊन तो बसल्याने परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच देहूरोड पोलिसांचे डीबी पथक, ११२ क्रमांकाचे पथक आणि अग्निशामक दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. खबरदारी म्हणून रुग्णवाहिकाही तैनात करण्यात आली. दरम्यान, उबेदुल्लाला खाली उतरविण्यासाठी पोलिसांनी त्याची प्रेयसी, गावाकडील नातेवाईक आणि ओळखीच्या व्यक्तींची मदत घेतली. मोबाईलवरून त्याच्याशी सातत्याने संवाद साधत समजूत काढण्यात आली. मात्र, त्याला खाली उतरविण्यासाठी सर्वांचीच चांगलीच कसरत करावी लागली. अखेर प्रेयसीला हातात हार घेऊन लग्नास होकार द्यायला लावण्यात आला. त्यानंतर त्याचे मन वळले. अग्निशामक दलाच्या मोठ्या क्रेनच्या मदतीने सायंकाळी सव्वासातच्या सुमारास त्याला सुखरूप खाली उतरविण्यात आले.

लग्नाला होकार मिळावा म्हणून शेख नावाचा तरुण मोबाईल टॉवरवर १०० फूट वर चढला होता. प्रेयसीला हार घेऊन खाली उभे केल्यानंतर तो टॉवरवरून उतरण्यास तयार झाला. त्याला नोटीस देऊन समज देण्यात आली आहे.

विक्रम बनसोडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, देहूरोड पोलिस ठाणे

पूजा साहित्याच्या दुकानांना मध्यरात्री लागली आग

अग्निशमन दलाच्या तत्पर कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला; आग विझविताना दोन अग्निशमन जवान जखमी; सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी येथील शगुन चौक परिसरात मध्यरात्री दोन पूजा साहित्याच्या दुकानांना आग लागल्याची घटना घडली. आगीची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याची मोहीम हाती घेतली. मुख्य अग्निशमन केंद्रासह नेहरूनगर, थेरगाव आणि रहाटणी अग्निशमन केंद्रांतील जवानांनी संयुक्तपणे केलेल्या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले.

अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग इतर दुकानांमध्ये पसरण्यापासून रोखण्यात आली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र आग विझविण्याच्या प्रयत्नात दोन अग्निशमन जवान किरकोळ जखमी झाले.

मध्यरात्री १२:४९ वाजता शगुन चौकातील दोन पूजा साहित्याच्या दुकानांना आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षाला मिळाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्य अग्निशमन केंद्र तसेच नेहरूनगर, थेरगाव आणि रहाटणी अग्निशमन केंद्रांतील अग्निशमन वाहने तातडीने रवाना करण्यात आली. घटनास्थळी पोहोचताच जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी विविध दिशांनी प्रयत्न सुरू केले. आगीच्या ठिकाणी परिस्थितीचा आढावा घेत जवानांनी दोन्ही दुकानांमध्ये कोणतीही व्यक्ती अडकलेली नसल्याची खातरजमा केली. त्यानंतर नियोजनबद्ध पद्धतीने पाण्याचा मारा करून आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. दोन्ही दुकानांमध्ये पूजा साहित्य आणि इतर वस्तूंचा साठा असल्याने त्यांचे आगीमुळे नुकसान झाले. मात्र, अग्निशमन दलाच्या जलद आणि प्रभावी कारवाईमुळे आग लगतच्या परिसरात पसरण्याचा धोका टळला.

या कारवाईदरम्यान फायरमन प्रणय शिर्के आणि फायरमन आदिल गोडे हे दोन जवान किरकोळ जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी वायसीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी घेत नागरिकांचे आणि परिसराचे संरक्षण करण्यासाठी अग्निशमन जवानांनी केलेले प्रयत्न या कारवाईतून अधोरेखित झाले.

सदर मोहिमेसाठी उप आयुक्त व्यंकटेश दुर्वास यांच्या मार्गदर्शनाखाली उप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले, लीडिंग फायरमन विजय घुगे, फायरमन प्रणय शिर्के, फायरमन आदिल गोडे यांच्यासह विविध अग्निशमन केंद्रांतील जवान आणि कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम केले.

त्यांच्या तत्परतेमुळे आग वेळेत नियंत्रणात आणून संभाव्य मोठे नुकसान टाळण्यात यश आले. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी घाबरून न जाता शांतता राखावी. आग लागल्याचे निदर्शनास आल्यास तातडीने अग्निशमन दलाच्या १०१ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधून घटनेचे ठिकाण आणि परिस्थितीची स्पष्ट माहिती द्यावी. तसेच अग्निशमन दलाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या वतीने यावेळी करण्यात आले.

नागरिकांचे जीवित आणि मालमत्तेचे संरक्षण करणे हे महापालिकेच्या अग्निशमन दलाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. शगुन चौक येथील आगीच्या घटनेत जवानांनी तत्परतेने आणि समन्वयाने केलेल्या कारवाईमुळे आग लगतच्या दुकानांमध्ये पसरण्यापासून रोखता आली आणि मोठी दुर्घटना टळली. या मोहिमेदरम्यान जखमी झालेल्या जवानांना तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रतिकूल परिस्थितीतही कर्तव्य बजावणाऱ्या अग्निशमन जवानांची कर्तव्यतत्परता आणि धाडस निश्चितच कौतुकास्पद आहे.

– डॉ. विजय सूर्यवंशी
आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका



भोसरीतील खासगी ट्रॅव्हल्स पार्किंगमध्ये चिखलाचे साम्राज्य!

परतीच्या पावसामुळे सहल गार्डनसमोरील पार्किंगमध्ये पाणी साचले; प्रवाशांची गैरसोय

भोसरी । प्रतिनिधी

भोसरी येथील सहल गार्डनसमोरील खासगी ट्रॅव्हल्स बस पार्किंग परिसरात परतीच्या पावसामुळे पाणी साचून चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स बसचालकांसह प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. असुन पार्किंग संबंधित मालकांनी लक्ष देण्याची गरज आहे

परतीच्या पावसाने पार्किंग परिसरात सर्वत्र पाणी आणि चिखल साचल्याने बस उभ्या करणे तसेच बसमध्ये चढ-उतार करताना प्रवाशांची गैरसोय होत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना चिखलातून मार्ग काढताना त्रास सहन करावा लागत आहे. पावसामुळे पार्किंग परिसराची दुरवस्था झाली असून, वाहनांच्या ये-जा करतानाही अडचणी निर्माण होत आहेत.



खासगी ट्रॅव्हल्स बससाठी महत्त्वाच्या असलेल्या या पार्किंग परिसरात पावसाळ्यात पाणी साचू नये, यासाठी योग्य नियोजन आणि पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. मात्र, सध्याच्या परिस्थितीमुळे पार्किंगच्या सुविधांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन पार्किंग परिसरातील पाण्याचा निचरा करावा, चिखल हटवावा आणि कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी प्रवासी व वाहनचालकांकडून होत आहे.

गोकुळच्या सत्तासंघर्षात शेतकऱ्यांच्या लोकशाहीचा गळा घोटू नका! : आ.सतेज पाटील

बहुमताचा कौल मान्य करा; निवडणूक प्रक्रिया अडविण्याचा प्रयत्न थांबवा, साडेचार लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या आवाजाला न्याय देण्याचे आवाहन

कोल्हापूर । प्रतिनिधी

कोल्हापूर जिल्ह्यातील लाखो दूध उत्पादक शेतकऱ्यांची जीवनवाहिनी असलेल्या गोकुळ दूध संघाच्या सत्तासंघर्षात शेतकऱ्यांनी दिलेल्या लोकशाहीच्या कौलाचा आदर केला पाहिजे. बहुमताचा निर्णय मान्य करण्याऐवजी तांत्रिक कारणांचा आधार घेऊन निवडणूक प्रक्रिया अडविण्याचा प्रयत्न करणे हा लोकशाहीचा अवमान असल्याची भूमिका आमदार सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील यांनी मांडली आहे. गोकुळमधील लोकशाही वाचविण्यासाठी साडेचार लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांचा आवाज बनून पत्रकारांनी वास्तव जनतेसमोर मांडावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.



यासंदर्भात महाराष्ट्रातील सर्व संपादक व पत्रकारांना पत्र पाठवून आमदार पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. गोकुळ दूध संघाच्या माध्यमातून सहकाराच्या गाथेवर घाला घातला जात असल्याची खंत व्यक्त करताना त्यांनी सहकार क्षेत्रातील लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्याची गरज अधोरेखित केली आहे. पत्रात नमूद केल्यानुसार, गोकुळच्या निवडणुकीत २५ पैकी २३ जागांवर समविचारी आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले. मात्र, २९ ऑक्टोबर रोजी झालेल्या अध्यक्ष निवडीच्या सभेला महायुतीचे सर्व १२ संचालक गैरहजर राहिले. त्यामुळे गणपूर्तीअभावी सभा तहकूब करण्याची वेळ आली. पराभव मान्य करण्याऐवजी तांत्रिक कारणांचा आधार घेऊन निवडणूक प्रक्रियाच अडविण्याचा हा प्रकार असल्याचा आरोप आमदार पाटील यांनी केला आहे. जनतेचा कौल तांत्रिक कारणांनी रोखला जात असेल, तर मतदानाचा अर्थ काय उरतो? केवळ गोकुळमधील बहुमतासाठी कायद्यात बदल करण्याची किंवा शासननियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार देऊन संख्याबळ फिरविण्याची चर्चा होत असेल, तर मग निवडणुका घ्यायच्याच कशाला? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. आज गोकुळमध्ये घडणाऱ्या घटना उद्या महानगरपालिका,

पान २ वर

दिवाळीसाठी पिंपरी आगारातून ४१० बसफेऱ्यांचे नियोजन; २११ अतिरिक्त फेऱ्या धावणार

पिंपरी । प्रतिनिधी

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मूळ गावी जाणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन राज्य परिवहन विभागाकडून विशेष बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. प्रवाशांची होणारी गर्दी आणि नियमित बससेवेवरील वाढता ताण लक्षात घेता पिंपरी-चिंचवड आगाराच्या वतीने ३ ते ८ नोव्हेंबर या कालावधीत एकूण ४१० बसफेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे.

यामध्ये २११ अतिरिक्त बसफेऱ्या, तर १९९ नियोजित बसफेऱ्यांचा समावेश आहे. या बससेवेचा लाभ प्रामुख्याने मराठवाडा, विदर्भ आणि खान्देशातील गावी जाणाऱ्या प्रवाशांना होणार आहे. मागील



वर्षाच्या तुलनेत या वर्षी अधिक गाड्या सोडण्यात येणार आहेत.

दिवाळीनिमित्त पुणे आणि पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरात कामानिमित्त वास्तव्यास असलेले अनेक नागरिक कुटुंबासह मूळ गावी जाण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे बसस्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी होते. विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि खान्देशातील विविध गावांकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन परिवहन विभागाने अतिरिक्त बसफेऱ्यांचे नियोजन केले आहे.

फलाटनिहाय माहितीमुळे प्रवाशांची धावपळ टळणार!

केवळ अतिरिक्त बसेस उपलब्ध करून देण्यापुरतेच नियोजन मर्यादित न ठेवता प्रवाशांना बस शोधताना होणारी गैरसोय टाळण्यासाठीही

पान २ वर

मावळमध्ये अवकाळीचा भातपिकाला फटका; रब्बी हंगामासाठी मात्र पाऊस ठरणार दिलासादायक

वडगाव मावळ । प्रतिनिधी

मावळ तालुक्यात गेल्या दोन दिवसांत झालेल्या अवकाळी पावसामुळे भात उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कापणी करून शेतात वाळत ठेवलेले भात भिजल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे, मात्र दुसरीकडे रब्बी हंगामासाठी हा पाऊस फायदेशीर ठरण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे अवकाळी पाऊस भात उत्पादकांसाठी संकट ठरत असला, तरी रब्बी हंगामासाठी वरदान ठरण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

मावळ तालुक्यातील पवन मावळ, नाणे मावळ तसेच अंदर मावळ या ग्रामीण भागात भातकापणीची कामे सुरू आहेत. अनेक शेतकऱ्यांनी भात कापून शेतात वाळत घातले आहे. कापलेले भात सुरक्षित ठिकाणी नेण्याची लगबग सुरू असतानाच अचानक आलेल्या पावसाने शेतकऱ्यांची धावपळ उडाली. भात भिजल्याने त्याचा दर्जा घसरण्याची, दाण्याला कोंब फुटण्याची तसेच साठवणुकीत अडचणी निर्माण होण्याची भीती आहे. परिणामी, उत्पादनासाठी केलेला खर्च आणि वर्षभराची मेहनत वाया जाण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

यंदा भातपिकाच्या कापणीच्या काळातच पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. भात कापणी, मळणी आणि सुरक्षित साठवणुकीसाठी अतिरिक्त मजुरी व खर्च करावा लागत आहे. भिजलेले भात पुन्हा वाळवणे, त्याची गुणवत्ता टिकवणे आणि बाजारात योग्य भाव मिळवणे ही आव्हाने शेतकऱ्यांसमोर उभी राहिली आहेत. त्यामुळे कृषी विभागाने नुकसानग्रस्त क्षेत्राची पाहणी करून पंचनामे करावेत आणि बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार मदत द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

महासंघाच्या करारामुळे महापालिका कर्मचाऱ्यांना ८.३३% बोनस व ३०,००० सानुग्रह अनुदानाचा लाभ

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आणि महापालिका प्रशासनासोबत झालेल्या पंचवार्षिक कराराला यश आले असून, महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना ८.३३ टक्के बोनस तसेच रु. ३०,०००/- सानुग्रह अनुदान मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. महापालिका कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी महासंघाने प्रशासनासोबत सातत्याने चर्चा व पाठपुरावा करून पाच वर्षांचा बोनस व सानुग्रह अनुदानाचा करार केला होता. या करारामुळे दरवर्षी बोनस व सानुग्रह अनुदानाबाबत कर्मचाऱ्यांना निश्चितता प्राप्त झाली आहे. यावर्षीही या कराराची प्रभावी अंमलबजावणी होत असून, पात्र महापालिका कर्मचाऱ्यांना ८.३३% बोनस आणि रु. ३०,०००/- सानुग्रह अनुदान मिळत आहे. त्यामुळे हजारो कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळाला आहे.



महासंघाने केलेल्या या करारामुळे कर्मचाऱ्यांना दरवर्षी बोनस व सानुग्रह अनुदानासाठी नव्याने संघर्ष करण्याची आवश्यकता कमी झाली असून, कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हिताचे संरक्षण करणारा हा करार महत्त्वपूर्ण ठरला आहे. महासंघाचे अध्यक्ष शशिकांत उर्फ बबनराव झिंजूर्डे यांनी सांगितले की, महापालिका कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी महासंघ सातत्याने संघर्ष करीत आहे. कर्मचाऱ्यांना मिळणारा बोनस व सानुग्रह अनुदान हा त्यांच्या हक्काचा आणि महासंघाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा विजय आहे. भविष्यातही कर्मचाऱ्यांच्या सर्व प्रश्नांसाठी महासंघ ठामपणे लढत राहील.

पिंपरी-चिंचवडच्या कामगारांची रोजची कसरत; प्रवासाचा त्रास, कारखान्यांत उकाडा अन् सुरक्षेचे प्रश्न

पिंपरी । प्रतिनिधी

सकाळी घरातून बाहेर पडायचे, वेळेत बस मिळवण्यासाठी बसथांब्यावर धाव घ्यायची, बस आली तरी जागा मिळेलच याची शाश्वती नाही. कधी बस थांबत नाही, तर कधी वाहतूक कोंडीत अडकून कामावर पोहोचण्यास उशीर होतो. कसाबसा कारखाना गाठल्यानंतर पत्र्याच्या शेडमधील उकाडा, तापलेल्या यंत्रांची धग आणि कानांवर सतत आदळणारा आवाज सहन करत कामाचा दिवस पूर्ण करायचा. संध्याकाळी पुन्हा तोच प्रवास आणि घरी पोहोचेपर्यंत शरीराचा झालेला शीण! पिंपरी-चिंचवडच्या औद्योगिक पट्ट्यात काम करणाऱ्या कामगारांच्या दैनंदिन जगण्याचे हे वास्तव आहे.

उद्योगनगरीच्या विकासाची चर्चा करताना नव्या कंपन्या, गुंतवणूक, उत्पादन आणि रोजगाराच्या आकडेवारीला महत्त्व दिले जाते. मात्र, या विकासाचा भार खांद्यावर घेणाऱ्या कामगाराच्या वाट्याला नेमक्या कोणत्या सुविधा येतात, याकडे कितपत गांभीर्याने पाहिले जाते? कामगाराच्या दिवसाची सुरुवातच संघर्षाने होत असेल आणि काम संपल्यानंतरही त्याची फरफट थांबत नसेल, तर औद्योगिक प्रगतीच्या दाव्यांसोबत त्याच्या जगण्याचा हिशेबही मांडण्याची वेळ आली आहे.

दुनगावच्या पाणीटंचाईवर प्रशासनाचा मोठा निर्णय; तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा, खासगी विहिरींचेही अधिग्रहण!

सामाजिक कार्यकर्ते निसार पटेल यांच्या प्रयत्नांना यश; उपविभागीय अधिकाऱ्यांचे आदेश जारी, ३१ मार्च २०२७ पर्यंत टँकरने पाणीपुरवठा

पाचोड । त्रिसिंग जायभाये

अंबड तालुक्यातील दुनगाव येथे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईची प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून गावाला तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच पाणीटंचाईवर उपाययोजना म्हणून खासगी विहिरी व बोअरवेल अधिग्रहण करण्याचे आदेशही जारी करण्यात आले आहेत. सामाजिक कार्यकर्ते निसार पटेल यांनी दुनगाव येथील पाणीटंचाईचा प्रश्न प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी प्रयत्न व पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आल्याने ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे.

दुनगाव परिसरात तीव्र पाणीटंचाई भासत असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती. महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून ग्रामस्थांकडून पाणीटंचाई दूर करण्याची मागणी होत होती. या परिस्थितीत सामाजिक कार्यकर्ते निसार पटेल यांनी पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या पाठपुराव्यामुळे या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले. तहसीलदार अंबड, गटविकास अधिकारी तसेच पंचायत समिती अंबड यांच्या संयुक्त पाहणी व अहवालानुसार पाणीपुरवठ्यासाठी टँकर सुरू करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, अंबड यांनी २ नोव्हेंबर २०२६ रोजी आदेश जारी करून २ नोव्हेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीसाठी तीन टँकरद्वारे पाणीपुरवठ्यास मंजुरी दिली आहे.



तीन टँकर, प्रत्येकी दोन खेपा

प्रशासनाच्या आदेशानुसार MH 41-U 4598 या वाहनाची क्षमता २४ हजार लिटर, MH 20 DE 2199 या वाहनाची क्षमता २४ हजार लिटर, तर MH 24--3448 या वाहनाची क्षमता १२ हजार लिटर आहे. प्रत्येक टँकरच्या दोन खेपा प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे गावातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यास मदत होणार आहे.

खासगी विहिरींचेही अधिग्रहण

केवळ टँकरवर अवलंबून न राहता पाणीटंचाई निवारणासाठी प्रशासनाने आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र पिण्याच्या पाण्याचे अधिग्रहण करण्याबाबतच्या अधिनियम १९८३ मधील कलम ३ अन्वये दुनगाव येथील पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी खासगी विहिरी व बोअरवेल अधिग्रहण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये संबंधित विहीर व बोअरवेल मालकांचा समावेश असून हा आदेश ३१ मार्च २०२७ पर्यंत लागू राहणार आहे.

पाणीपुरवठ्यावर प्रशासनाची राहणार नजर

टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना गावातील लोकसंख्येच्या प्रमाणात खेपा निश्चित करणे, टँकरच्या खेपांची नोंद ठेवणे, जीपीएस प्रणालीद्वारे वाहनांच्या फेऱ्यांची पडताळणी करणे, पाणीपुरवठ्याचे प्रमाणपत्र घेणे आणि नागरिकांच्या तक्रारींची तातडीने दखल घेणे अशा विविध अटी आदेशात नमूद करण्यात आल्या आहेत. गावातील नागरिकांना दरडोई दररोज किमान २० लिटर पाणी उपलब्ध होईल, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या संपूर्ण पाणीपुरवठा व्यवस्थेच्या अंमलबजावणीची जबाबदारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती अंबड यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तहसीलदार अंबड व संबंधित अधिकाऱ्यांनी आदेशातील अटींचे पालन होत असल्याची दक्षता घ्यावी, असेही नमूद करण्यात आले आहे.

निसार पटेल यांच्या प्रयत्नांचे ग्रामस्थांकडून स्वागत

दुनगाव येथील पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते निसार पटेल यांनी केलेल्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले आहे. प्रशासनाने तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि खासगी विहिरींचे अधिग्रहण करण्याचा निर्णय घेतल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. आता मंजूर आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होऊन प्रत्येक कुटुंबाला नियमित व पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी मिळावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.